मेसर्स शिखर केमिकल्स ही कंपनी या खटल्यात फिर्यादी आहे. प्रतिवादी कंपनीने शिखर केमिकल्सला ५२ लाख ३४ हजार ३८५ रुपयांच्या धाग्यांचा पुरवठा केला होता. शिखर केमिकल्सने त्यापैकी ४७ लाख ७५ हजार रुपये पुरवठादार कंपनीला दिले होते. उर्वरित रकमेसाठी पुरवठादार कंपनीने न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला. हे प्रकरण फौजदारी नसून दिवाणी न्यायालयात चालविले गेले पाहिजे असे म्हणत फिर्यादी शिखर केमिकल्सने फौजदारी खटला रद्द करण्याची मागणी अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे केली. या अर्जावर न्या. प्रशांत कुमार यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायाधीशांनी फौजदारी खटला चालवण्याचे समर्थन करताना आक्षेपार्ह टिप्पणी केली. हे प्रकरण जर दिवाणी न्यायालयात चालवले तर वर्षानुवर्षे खटला चालेल आणि संबंधितांना थकबाकी मिळण्यास विलंब होईल, असे न्या. प्रशांत कुमार म्हणाले. या वक्तव्यावर सर्वोच्च न्यायालयाने संताप व्यक्त केला.

न्या. प्रशांत कुमार यांच्या या निर्णयाला शिखर केमिकल्सने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर माधवन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.

देश विदेश

# चीनचा अँट समूह पेटीएम कंपनीतून बाहेर पडणार

■ बीजिंग

**चीनचा** अँट उद्योग समूह पैशांच्या ऑनलाईन देवाण-घेवाणीतील अग्रणी कंपनी पेटीएममधून पूर्णपणे बाहेर पडणार आहे. अँट समूह पेटीएममधील उर्वरित ३ हजार ८०० कोटींचे समभाग विकण्याच्या तयारीत आहे.

अँट समूह हा चीनच्या दिग्गज बहुराष्ट्रीय अलिबाबा समूहाशी संलग्न आहे. अँट समूहाने याआधी पेटीएममधील आपला काही हिस्सा विकला आहे. आता उर्वरित ५.८४ टक्के हिस्सेदारी अँट समूह प्रति समभाग १ हजार २० रुपये दराने विकणार आहे. ही समभाग विक्री गोल्डमॅन सॅक्स इंडिया सिक्युरिटीज आणि सिटी ग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया या दोन कंपन्यांच्या माध्यमातून केली जाणार आहे.

अँट समूहाने पेटीएममधून बाहेर पडण्याचा निर्णय अशा वेळी घेतला आहे की, ज्यावेळी पेटीएमचे समभाग तेजीत आहेत. मागील पाच महिन्यांत कंपनीच्या समभागांनी तब्बल ५२ टक्के वाढ नोंदविली आहे.

# शेख हसीनांचे निवासस्थान संग्रहालयात रुपांतरित होणार

■ ढाका

**भारतात** वास्तव्यास असलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे जुने सरकारी निवासस्थान 'गणभवन' संग्रहालयात रुपांतरित करण्याचा निर्णय बांगलादेशच्या अंतरिम सरकारने घेतला. या निवासस्थानाला 'जुलै क्रांती स्मारक संग्रहालय' असे नाव देण्यात येणार आहे.

पूर्वी हे निवासस्थान इस्टेट राजबाडी म्हणून ओळखले जात होते. हे निवासस्थान राजधानी ढाकामधील शेर-ए-बांगला नगर येथे संसद भवनाजवळ आहे. बांगलादेश सरकारने ते देशाच्या नेत्याचे अधिकृत निवासस्थान म्हणून वापरले. शेख हसीना २०१० मध्ये येथे राहायला आल्या आणि ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत १५ वर्षे त्या या निवासस्थानात राहिल्या. गेल्या वर्षी बांगलादेशात सत्तापालटानंतर निवासस्थानाची तोडफोड आणि लूटमार सुरू झाली. आंदोलक या निवासस्थानावर चढले होते. आंदोलकांनी येथून सजावटीच्या वस्तू, घड्याळे, सोफा, आलिशान हँडबॅग्ज, मासे आणि अगदी महिलांचे कपडेही लुटले. त्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने गणभवनला शेख हसीना यांच्या कुशासनाचे प्रतीक म्हटले.

# नोएडात कारमध्ये दोन जण मृतावस्थेत आढळले

■ नोएडा

**आज** सकाळी नोएडामध्ये पोलिसांना एका बंद कारमध्ये दोन जण मृतावस्थेत आढळून आले. सचिन(२७) आणि लक्ष्मी शंकर (५०) अशी त्यांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

प्रथमदर्शनी या दोघांनी कारमध्ये बसून मद्यपान केले असावे. त्यानंतर मद्याच्या नशेत बंद कारमध्ये पडून राहिल्याने त्यांचा गुदमरून मृत्यू झाला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला.

# श्रीमंत लोक थेट सर्वोच्च न्यायालयात का येतात?

सुप्रीम कोर्टाचा संतप्त सवाल

■ नवी दिल्ली

**समाजातील** प्रतिष्ठीत आणि श्रीमंत व्यक्ती फौजदारी गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये दिलासा मिळवण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात का येतात, असा संतप्त सवाल न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने एका याचिकेवरील सुनावणीप्रसंगी आरोपीच्या वकिलांना ठणकावून विचारला. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि त्यांचे पुत्र चैतन्य बघेल यांनी तपास यंत्रणांची दंडात्मक कारवाई आणि पीएमएलए कायद्यातील तरतुदींना थेट सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेवरील सुनावणीप्रसंगी न्यायालयाने हा सवाल विचारला. उच्च न्यायालयेदेखील घटनात्मक आहेत. तिथेही अशा प्रकरणांमध्ये निकाल दिला जातो. उच्च न्यायालये अशा प्रकरणांमध्ये निकाल देऊ शकत नाहीत किंवा न्यायनिवाडा करू शकत नाही.

# येमेन समुद्राजवळ बोट बुडून ६८ जणांचा मृत्यू

■ साना



**येमेनमधील** अबयान प्रांताच्या समुद्रकिनाऱ्याजवळ स्थलांतरितांनी भरलेली बोट बुडाली. या बोटीत १५४ लोक होते. त्यापैकी ६८ जणांचा मृत्यू झाला आणि ७४ जण अजूनही बेपत्ता झाले.

बोटीतील सर्वाधिक स्थलांतरित इथिओपियाचे होते. जे बोटीने येमेनमार्गे सौदी अरेबियात रोजगाराच्या शोधात निघाले होते. एडेनच्या आखातात ही बोट उलटली. फक्त १० जणांना वाचवण्यात आले. ज्यात ९ इथिओपियन आणि एक येमेनी नागरिक आहे. बचाव कर्मचारी सतत मृतदेह आणि संभाव्य वाचलेल्यांचा शोध घेत आहेत. इथिओपिया आणि सोमालियासारख्या देशांमध्ये गरिबी, बेरोजगारी आणि अस्थिरता लोकांना धोकादायक समुद्री प्रवास करण्यास भाग पाडते. येमेन यादवी युद्धाशी झुंजत असला तरी स्थलांतरितांसाठी आखाती देशांमध्ये पोहोचण्याचा एक मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेच्या मते, २०२४ मध्ये आतापर्यंत ६०,००० हून अधिक स्थलांतरितांनी येमेनमधून प्रवास केला आहे.

# मौजे पाचोऱ्यातील भुखंडावरील क्रीडांगणाचे आरक्षण रद्द

■ मुंबई

**जळगाव** जिल्ह्यातील मौजे पाचोरा येथील भूखंडावरील क्रीडांगणाचे आरक्षण रद्द करून तो भूभाग आता रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यास आज राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे स्थानिक विकास आराखड्यात बदल होणार असून संबंधित भूखंडावर आता निवासी प्रकल्प उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या भूखंडावर यापूर्वी क्रीडांगणासाठी आरक्षण होते. मात्र काही कारणास्तव हे आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.



दरवर्षीप्रमाणे गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी लालबाग मार्केट सज्ज झाले आहे. घरगुती गणपतींसाठी आकर्षक मखर विक्रीसाठी मांडण्यात आले आहेत.

# कालभैरव यात्रा काढणार नाही नांदणी ग्रामस्थांचा निर्णय

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** शिरोळ तालुक्यातील नांदणी मठातील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला गुजरातच्या वनतारामध्ये नेण्यात आले आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप असून महादेवी परत येईपर्यंत कालभैरव यात्रा काढणार नाही असा ठाम निर्णय गावकऱ्यांनी घेतला आहे. नांदणी गावातील श्री कालभैरवनाथ व श्री बिरोबा देवाच्या पालखी मिरवणुकीसह मोठ्या भक्तिभावात यात्रा दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडते. यंदा ही यात्रा रविवार १० आणि सोमवार ११ ऑगस्ट रोजी आहे. या यात्रेत महादेवी हत्तीणीचा देखील सहभाग असतो. पण ती वनतारामध्ये असल्याने तिचा यावर्षी यात्रेत सहभाग राहणार नाही.

# उत्तर गोव्यात युनिटी मॉलला ग्रामस्थांचा विरोध

■ पणजी

**उत्तर** गोवा जिल्ह्यातील तिसवाडी तालुक्यात हेल्थ सिटी, आयटी पार्कनंतर आता युनिटी मॉल आणि १७ मजली सरकारी कचेरी प्रकल्प चिंबलवासीयांवर लादण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे गावातील जैवविविधताच नष्ट होऊन जाईल. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आम्ही हे प्रकल्प होऊ देणार नाही, असा इशारा देऊन चिंबल ग्रामसभेत त्यास तीव्र विरोध करण्यात आला.

चिंबलचे सरपंच संदेश शिरोडकर यांच्या अध्यक्षतेखाली चिंबल पंचायतीच्या सभागृहात ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी चिंबल तलावाशेजारील सुमारे ४.५ लाख चौरस मीटर जमीन या प्रकल्पांच्या नावाखाली हस्तांतरित करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप ग्रामस्थ गोविंद शिरोडकर यांनी केला. सरकारी प्राथमिक शाळेत झालेल्या या ग्रामसभेला ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या ग्रामसभेच्या सुरुवातीलाच युनिटी मॉलबाबत ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला. यापूर्वी तीन ग्रामसभांमध्ये या मॉलला विरोध करून तो पुढे का रेटला जात आहे? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला. दरम्यान, या प्रस्तावित मॉल प्रकल्पाला विरोध करण्यासाठी तसेच चिंबलचा ऐतिहासिक तलाव आणि जैवविविधता वाचविण्यासाठी लवकरच जनसभा घेण्यासह जागृती फेरी काढण्याचा निर्णय ग्रामस्थांच्यावतीने घेण्यात आला.

गावातील जैवविविधता नष्ट होणार

# ३ वर्षांपासून बेस्टचे सेवानिवृत्त कर्मचारी ग्रॅच्युइटीपासून वंचित

■ मुंबई

**बेस्टच्या** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी आणि रजांच्या रोखीकरणासह अन्य देणी गेल्या तीन वर्षांपासून मिळालेली नाहीत. २०२२ नंतर चार हजारपेक्षा जास्त निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी थकली असल्याने त्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे. ही देणी त्वरित देण्याची मागणी बेस्ट कर्मचारी सातत्याने करत आहेत. परंतु अद्याप त्यांची मागणी पूर्ण झालेली नाही. मुंबई महापालिकेने अर्थसंकल्प अहवालात बेस्ट उपक्रमाला भांडवली खर्चासाठी १७,०६६.१२ कोटी, कार्यकारी खर्चासाठी ३,२६८.९७ कोटी, त्याचप्रमाणे २,१३२.५१ कोटी इतकी रक्कम अनुदान सेवांच्या प्रतिपूर्तीसाठी प्रस्तावित केली आहे. तरीही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी आणि अंतिम देयक मिळत नसल्यामुळे निवृत्त कर्मचारी हवालदिल झाले आहेत. ग्रॅच्युइटी कायदा १९७२ व बेस्ट वर्कर्स युनियनसोबत झालेल्या कराराचे उल्लंघन करून १ ऑगस्ट २०२२नंतर निवृत्त झालेल्या चार हजार बेस्ट कर्मचाऱ्यांची देणी अद्याप देण्यात आलेली नाहीत. सेवानिवृत्तीनंतर ३० दिवसांच्या कालावधीत ग्रॅच्युइटी रक्कम अदा करणे बंधनकारक आहे.

# अण्णाभाऊंच्या पुतळ्यासाठी आज इस्लामपुरात 'टक्कर मोर्चा'

■ इस्लामपूर

**इस्लामपूर** शहरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा व स्मारक उभारण्याची मागणी प्रलंबित आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर जयंती महोत्सव समितीने १ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयासमोरच अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याची प्रतिष्ठापना केली.

आता हा पुतळा कायमस्वरूपी याच ठिकाणी राहावा, या मागणीसाठी मातंग समाज व सर्व पुरोगामी संघटनांच्यावतीने उद्या बुधवार ६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयावर 'टक्कर मोर्चा' आयोजित केला आहे.



गेली अनेक वर्षे सत्यशोधक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव समिती शहरात अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी पाठपुरावा करत आहे. दलित महासंघ, डीपीआय, तसेच इतर मागासवर्गीय संघटनांनी एकत्रित येऊन लढा उभारला आहे.

पुतळ्यासाठी जागा देण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे शुक्रवारी अण्णा भाऊंच्या जयंतीदिनीच तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरच कार्यकर्त्यांनी पुतळा बसवला. आता हा बसविलेला पुतळा त्याच ठिकाणी कायमस्वरूपी राहावा, अशा मागणीचे निवेदन तहसील कार्यालयाला दिले आहे. उद्या बुधवारी निघणाऱ्या मोर्चाची सुरुवात वाळवा पंचायत समितीपासून होईल. हा मोर्चा इस्लामपूर शहरातील प्रमुख मार्गावरून निघणार आहे.

# मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकून कामगाराचा मृत्यू

■ पुणे

**पुण्यातील** नांदेड सिटी परिसरातील कलाश्री सोसायटीसमोर ड्रेनेज पाईपलाईनच्या कामावेळी मातीचा ढिगारा कोसळून कनिराम प्रजापती या कामगाराचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत चेतलाल प्रजापती आणि खुर्शीद अली हे दोन कामगार जखमी झाले आहेत.

महानगरपालिकेच्या जायका प्रकल्पाअंतर्गत नदी सुधारणा कामासाठी रस्त्याच्या कडेला पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू होते. जेसीबीने खोदकाम सुरू असताना अचानक मोठा मातीचा ढिगारा कोसळला. त्याखाली कनिराम, चेतलाल आणि खुर्शीद अली हे तीन कामगार गाडले गेले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी पोहोचले. चेतलाल प्रजापती आणि खुर्शीद अली यांना तत्काळ बाहेर काढून नांदेड सिटी मल्टिस्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र कनिराम प्रजापती यांचा ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला.

# विजय पाटील हत्या प्रकरणात तिघे दोषी! १० जणांची सुटका

■ कल्याण

**१८ वर्षांपूर्वी** कल्याण पूर्व येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते वंडार पाटील यांचा मुलगा विजय पाटील यांची हत्या झाली होती. या हत्येप्रकरणी कल्याण न्यायालयाने तीन आरोपींना दोषी ठरवले असून, शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी महेश पाटील यांच्यासह दहा जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. दोषी आरोपींना ७ ऑगस्ट रोजी शिक्षा सुनावली जाईल.

शिवसेना शिंदे गटाचे महेश पाटीलही निर्दोष

या हत्येप्रकरणी विजय बाबुराव वाकडे, साजिद हमीद शेख आणि सुनील रामचंद्र भोईर या तिघांना दोषी ठरवले. तर हत्येच्यावेळी



महेश पाटील हे न्यायालयात असल्याचे सिद्ध झाल्याने महेश पाटील यांची सुटका झाल्याचे त्यांच्या वकिलांनी सांगितले. २३ मार्च २००६ रोजी गोलवली येथे होळीच्या कार्यक्रमात बाळा भोईर यांची हत्या झाली होती. या हत्येचा बदला घेण्यासाठी १० एप्रिल २००७ रोजी विजय पाटील यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप होता. या प्रकरणात शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी महेश पाटील यांच्यासह एकूण १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि गेल्या १८ वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. याप्रकरणी न्यायालयाने विजय बाबुराव वाकडे, साजिद हमीद शेख आणि सुनील रामचंद्र भोईर या तिघांना दोषी ठरवले आहे. त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. या सुनावणीदरम्यान न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दोषी आरोपींना ७ ऑगस्ट रोजी शिक्षा सुनावली जाईल.

# वाल्मिक कराड दोषमुक्तीसाठी उच्च न्यायालयात अर्ज करणार?

■ बीड

**बीडच्या** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा दोषमुक्ती अर्ज बीड विशेष मोक्का न्यायालयाने फेटाळल्याने कराड आता वकिलांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेणार आहे. दोष मुक्तीच्या अर्ज संदर्भात आणि दोषारोप पत्रासंदर्भात उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली जाणार आहे.

वाल्मिक कराडने आपण निर्दोष असल्याचा दावा करत दोषमुक्तीचा अर्ज विशेष न्यायालयात सादर केला होता. पण विशेष मोक्का न्यायालयाने तो फेटाळून लावताना निरीक्षणात म्हटले की, वाल्मिक कराड हा मुख्य सूत्रधार आहे.

तो गुन्हेगारी टोळीचा सदस्य आहे. मृत संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात तो सहभागी होता. या टोळीवर २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. मागच्या दहा वर्षांत गंभीर स्वरूपाचे सात गुन्हे दाखल आहेत तर बीड जिल्हा न्यायालयात ११ प्रलंबित फौजदारी खटले आहेत.

# दत्तात्रय भरणे यांनी कृषिमंत्री पदाचा पदभार स्वीकारला

■ मुंबई

**राज्याचे** नवे कृषिमंत्री म्हणून दत्तात्रय भरणे यांनी आज पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच कृषी विभागातील एमपीएससीमध्ये उत्तीर्ण झालेल्या १४ जणांची नियुक्ती करणाऱ्या पत्रावर त्यांनी सही केली. यावेळी ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी मला कृषिमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मला माहिती आहेत. त्यामुळे मला हे खाते मिळाले आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय मी घेणार आहे. मी काल मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, राज्यात प्रत्येक ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घ्या. राज्याच्या प्रमुख म्हणून मी पूर्णपणे मदत करेन.

# नेहरू सेंटरमध्ये विनामूल्य संगीत नाटक महोत्सव

दररोज चार नाटकांची मेजवानी

■ मुंबई

**मुंबईच्या** नेहरु सेंटरमध्ये येत्या ११ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट दरम्यान संगीत नाटकांचा महोत्सव रंगणार असून रसिक प्रेक्षकांना त्याचा विनामूल्य आनंद घेता येणार आहे. नेहरु सेंटर गेल्या ३२ वर्षांपासून हा संगीत नाटक महोत्सव भरवत आहे. या महोत्सवात प्रेक्षकांना दररोज संध्याकाळी ६ वाजता ४ नाटके पाहाता येणार आहेत. या महोत्सवात 'हे बंध रेशमाचे' बावनखणी, अमृतवेल, गोष्ट संयुक्त मानामानाची या संगीत नाटकांचा समावेश आहे. संगीत रंगभूमीवरील दिग्गज कलाकार यात सहभागी होणार आहेत. पहिल्या दिवशी रणजीत देसाई लिखित आणि रवींद्र खरे दिग्दर्शित 'हे बंध रेशमाचे' नाटक सादर केले जाणार आहे. दुसऱ्या दिवशी श्रीकांत दादरकर यांचे रंगावृती, नेपथ्य संकल्पना आणि दिग्दर्शन असलेले 'संगीत बावनखणी' हे नाटक होणार आहे. ज्ञानेश पेंढारकर यांचे मार्गदर्शन आणि स्मृती तळपदे यांचे नृत्य दिग्दर्शन ही या नाटकाची जमेची बाजू आहे. तिसऱ्या दिवशी 'संगीत अमृतवेल' हे नाटक सादर होणार असून ते संत चोखामेळा यांच्या जीवन चरित्रावर आधारित आहे. डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन मनोहर जोशी यांनी केले आहे.

# इंडिया आघाडीच्या बैठकीमुळे सत्ताधारी एनडीएची घाबरगुंडी

■ नवी दिल्ली

**भाजपाच्या** नेतृत्वाखालील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ)सरकारने ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीचा धसका घेतला आहे. त्यामुळेच आज घाईघाईने रालोआने बैठक बोलावली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काहीही कारण नसताना सत्कार केला, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केली.

भाजपा आणि रालोआला ऑपरेशन सिंदूर प्रमाणाबाहेर



संजय राऊतांची टीका

यशस्वी झाले असे वाटते. त्यामुळे त्यांनी हे ऑपरेशन करवणाऱ्या मोदींचा सत्कार केला. खरेतर मोदी आणि शहा यांनी अशा गर्जना केल्या होत्या की, आता पाकव्याप्त काश्मीर आपल्याला मिळालेच असे आम्हालाही वाटू लागले होते. तसे झाले असते तर आम्हीदेखील मोदींचा सत्कार केला असता, असा तिरकस टोला राऊत यांनी लगावला.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी चीनबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल राऊत यांनी राहुल गांधी यांची पाठराखण केली. चीनने भारताचा भूभाग गिळंकृत केला हे वास्तव आहे.

याआधी विरोधकांनी अनेकदा चीनबद्दल सवाल उपस्थित केले होते. राहुल गांधी यांनीही तेच केले. त्यात त्यांचे काही चुकले असे वाटत नाही, असे राऊत म्हणाले.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# एक देश समान करचोरी

जगातली तिसरी आर्थिक सत्ता होण्याच्या दिशेने सरकारलाही घाई झालेली आहे आणि त्या दृष्टिकोनातून सगळ्या स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. याची पहिली अट किंवा निकष म्हणजे भारतातील कर रचना आणि बँकिंग व्यवस्था अधिक सुदृढ करणे हे महत्त्वाचे पाऊल ठरते. या दृष्टिकोनातून सरकारच्या अखत्यारीत असलेल्या सार्वजनिक बँका नफ्यात आणण्याचा निर्णय घेतला गेला. त्याला काही वर्षात सातत्याने प्रयत्न करून तोट्यात चालणाऱ्या या सरकारी बँका फायद्यात आणण्यात यश मिळालेले आहे. त्यापाठोपाठ जे सरकारी उपक्रम आहेत जसे बीएसएनएल किंवा विदेश संचार निगम, एचकेएल, भिलई स्टील प्लँट यासारख्या सरकारी उपक्रमांना तोट्यातून बाहेर काढणे हे देखील सरकारचे उद्दिष्ट होते. त्याच्या बरोबरीने देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने कर रचनेवर बऱ्यापैकी अवलंबून असतो. जवळपास दहा वर्षांपूर्वी सुरू झालेली भारताची वस्तु सेवा कर प्रणाली ही यशस्वी ठरलेली आहे आणि आज देशभरातून दरवर्षी सातत्याने या कर संकलनामध्ये मोठी वाढ होताना दिसून येते. परंतु एकीकडे ही वाढ होत असताना त्याच्या इतकीच वस्तू सेवा करातून चोरी देखील झाल्याचे आता नव्याने समोर आले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये जवळपास साडेसात लाख कोटीपेक्षा जास्त वस्तू सेवा कर म्हणजेच जीएसटी कर चुकवल्याची अनेक प्रकरणे समोर आलेली आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात जर वस्तू सेवा कराची चोरी होत असेल तर जी जीएसटी कर प्रणाली यशस्वी ठरली असे म्हणतो. तिथेच अनेक त्रुटी किंवा उणिवा आहेत हे सुद्धा मान्य करावे लागेल. खरे तर कोणत्याही प्रकारे कर चोरी करता येऊ नये आणि प्रत्येकाला कर भरणे सोपे व्हावे या दृष्टिकोनातून जीएसटी कर प्रणाली आणली गेली होती. परंतु त्यामध्ये पळवाटा शोधून व्यापाऱ्यांनी किंवा अनेक कॉर्पोरेट कंपन्यांनीसुद्धा त्यातून आपला पैसा वाचवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आज साडेसात लाख कोटींची करचोरी होते म्हणजेच इतका पैसा सरकारच्या तिजोरीत येऊ शकलेला नाही. जर तो सगळा पैसा आला असता किंवा कर चोरी थांबवता आली असती तर भारताच्या अर्थव्यवस्थेला आणखीनच मोठे भांडवल मिळू शकले असते. सातत्याने कर चोरी वाढत असताना सरकारकडून झालेले दुर्लक्ष हे सुद्धा अत्यंत गंभीर स्वरूपाचे ठरते कारण पाच वर्षांमध्ये साडेसात लाख कोटी म्हणजे सरासरी दर वर्षाला पाऊण लाख कोटींची कर चोरी सहजपणे होते हे त्यातून स्पष्ट होते.

**सरकारपुढची आव्हाने**

इतक्या मोठ्या प्रमाणावर जर व्यापारी आणि कॉर्पोरेट कंपन्या वेगवेगळ्या युक्त्या प्रयुक्त्या वापरून कर चोरी करत असतील तर या वस्तू सेवा कर प्रणालीत बरेच मोठे बदल करणे गरजेचे ठरते. केवळ वेगवेगळ्या वस्तूंवर कर आकारणी केली म्हणजे वस्तू सेवा कर अधिक चांगल्या पद्धतीने भक्कम केला गेला असा एकतर्फी समज करून चालणार नाही. उलट ज्या वस्तूंवर कर आकारणी होते आहे त्या कराची वसुली करण्याकरता जी काही यंत्रणा निर्माण केली गेली त्या यंत्रणेमध्येच बऱ्यापैकी दोष आहेत हे यातून सिद्ध होते. करसंकलनासाठी निर्माण केल्या गेलेल्या वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये भ्रष्टाचारही तेवढाच असल्याशिवाय इतकी मोठे कर चोरी होऊ शकणार नाही. सरकारने आपल्या कर संकलनामध्ये वाढ व्हावी म्हणून प्रयत्न चालवलेला असतानाच कर भरण्याची टाळाटाळ करणाऱ्यांची संख्या तितकीच मोठी आहे या करबुडव्यांना ती शोधून काढणे आणि त्यांच्या सगळ्या पळवाटा बंद करणे तितकेच महत्त्वाचे ठरते किंबहुना ते उद्दिष्ट साध्य करणे हे आता सरकार पुढचे सर्वात मोठे आव्हान आहे. म्हणजे कर संकलनाबाबत सरकारकडून जी बढाई मारली जाते त्यापेक्षा कर चोरीमधून होणारे नुकसान अधिक आहे असे म्हणावे लागते. हे नुकसान लक्षात घेतले तर सरकारच्या या प्रणालीमध्ये बरेच दोष असल्याचे मान्य करावे लागेल.

**यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार**

सुरूवातीच्या काळात या करआकारणीबाबत अनेक प्रकारचे संभ्रम होते. त्यामधल्या त्रुटी लक्षात आणून द्यायचे कामही अनेक अर्थतज्ज्ञांनी केले होते. संपूर्ण देशात समान करप्रणाली असावी. म्हणजेच एक देश समान कर आकारणी असा व्यापक उद्देश ठेवला गेला. त्याचे निश्चितच काही चांगले परिणाम समोर आलेले आहेत. केंद्राकडून गोळा होणारा या कराचा योग्य तो वाटा राज्य सरकारांनाही दिला जातो. म्हणजे आता या करप्रणालीची घडी नीट बसत असतानाच करचोरीचा हा प्रकार म्हणजे करआकारणीतला बिघाडही समोर आणणारा ठरतो. एक देश आणि समान करचोरी असे त्याला स्वरूप आलेले दिसते. सरकारकडून यासंदर्भात केल्या जात असलेल्या उपाययोजना तितक्याशा प्रभावी ठरलेल्या दिसत नाहीत. अन्यथा इतकी मोठी करचोरी करण्याचे धाडस व्यापाऱ्यांना झालेली नसते. जसे आयकर चुकवण्यासाठी करसल्लागार मदत करतात. किंवा आयकर खात्यातले अधिकारीदेखील छुप्या पद्धतीने मदत करीत असतात. तशीच एखादी मोडस ऑपरेंडी वस्तुसेवाकर संकलनात वापरली जात असावी. ज्यामध्ये सरकारी यंत्रणांचाही हातभार लागत असला पाहिजे. यातून सरकारपुढची आव्हाने दोन प्रकारची दिसून येतात. एक म्हणजे त्यातले दोष दूर करणे आणि दुसरा यंत्रणांमध्ये होणारा गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचारही खणून काढणे ,या सगळ्या प्रकारचे गांभिर्य सरकारने लक्षात घेतलेले असेलच. वस्तुसेवाकर असे त्याला म्हणत असताना बेमालूमपणे चालणारी करचोरीची सेवा म्हणजे संगनमताने चालणारा मोठा गैरव्यवहारही ठरू शकतो. यासाठी राज्य सरकारांना विश्वासात घेऊन त्यांचीदेखील मदत घेतली पाहिजे.


**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

संघर्ष सुद्धा त्यांनाच निवडतो, ज्यांच्यात लढण्याची ताकत असते.

**पंचांग**

बुधवार, ६ ऑगस्ट २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर



श्रावण शुक्ल द्वादशी
नक्षत्र : मूळ

रवी उदय- ०६-१९
रवी अस्त- १९-१०

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

प्रदोष; शाकदान दधिव्रत; बुधपूजन; हिरोशिमा दिन

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



## पाककृती

### फोडशीची भाजी



★ **साहित्य -** फोडशीचे २ घड, अर्धा हरभरा (चना डाळ), १ मोठा कांदा, चिरलेला, लसूण ३ ते ४ पाकळ्या, चिरून, मोहरी, जिरे, हळद पावडर, लाल तिखट, जिरे-धणे पावडर, गरम मसाला, चवीनुसार मीठ, तेल.

★ **कृती -** चणा डाळ धुवून ३ तास पाण्यात भिजत ठेवा. फोडशीची पाने धुवा, पांढरा भाग तळापासून कापून टाका. कढईत १ चमचा तेल गरम करा. त्यात मोहरी आणि जिरे टाका. जेव्हा ते तडतडायला लागतात तेव्हा चिरलेला लसूण घाला. काही सेकंद परतावे. चिरलेला कांदा घाला. एक मिनिट परतून घ्या. भिजवलेली चणाडाळ घालून परतावे. हळद, मीठ घालून झाकण ठेवून चणा डाळ अर्धवट शिजेपर्यंत शिजवा. आता चिरलेली फोडशी घालून मिक्स करा. मधूनमधून ढवळत, ८ ते १० मिनिटे झाकण ठेवून शिजवा. लाल तिखट, जिरे, धने पावडर आणि गरम मसाला घाला. आणखी २ मिनिटे शिजवा. फोडशी भाजी तयार आहे.



# अमेरिकेत तृतीयपंथी खेळाडूंना व्हिसा बंदी



**अमेरिकेने महिला ॲथलिट खेळाडूंच्या सुरक्षेसाठी व निकोप स्पर्धेसाठी तृतीयपंथीय महिला खेळाडूंना यापुढे व्हिसा नाकारणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अमेरिकेत होणाऱ्या स्पर्धांसाठी ही बंदी घालण्यात आली आहे.**

■ वॉशिंग्टन

अमेरिकेच्या क्रीडा आणि इमिग्रेशन धोरणात हे बदल करण्यात आले आहेत. पॅरिस ऑलिंपिकमध्ये बॉक्सींगच्या एका सामन्यात तृतीयपंथीय महिला खेळाडूने मारलेल्या ठोशामुळे वाद निर्माण झाला होता. त्यानंतर जगभर या विषयाची चर्चा झाली. पुरुष किंवा तृतीयपंथीय खेळाडू आपल्यावर काही वैद्यकीय उपचाराच्या सहाय्याने महिला होतात व त्यानंतर या खेळांमध्ये भाग घेत असतात. लिंग चाचणीत त्या महिला म्हणूनच सिद्ध होत असतात. या प्रकारामुळे जगभरातील क्रीडा क्षेत्रात तणाव निर्माण झाला आहे. अमेरिकेने काल जारी केलेल्या अध्यादेश क्रमांक १४२०१ चे शिर्षकच पुरुषांना महिलांच्या खेळांपासून दूर ठेवण्यासाठी व्हिसा धोरण असे ठेवले आहे. यामुळे खेळाडूंसाठीच्या व्हिसा धोरणात बदल करण्यात आला आहे. अमेरिकेने म्हटले आहे की हा नियम खेळाडूंची सुरक्षा, समान संधी व सन्मानासाठी आवश्यक आहे. त्यामुळे, यापुढे केवळ महिला खेळाडूंनाच अमेरिकेचा व्हिसा देण्यात येईल. या निर्णयाचे अमेरिकेतील व इतर देशातील महिला खेळाडूंनी स्वागत केले आहे. तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी लढणाऱ्या काही संस्थांनी मात्र या निर्णयाला विरोध केला आहे. समाजातील एका घटकावर अन्याय करणारा हा निर्णय असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## जोकोविच सिनसिनाटी खुल्या स्पर्धेत खेळणार नाही

■ वॉशिंग्टन



जागतिक टेनिस स्पर्धांमध्ये २४ ग्रॅण्ड स्लॅम जिंकणारा नोवाक जोकोविच याने सिनसिनाटी खुली टेनिस स्पर्धा न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. यामागे कोणतेही वैद्यकीय कारण नसल्याचे त्याने म्हटले आहे. तो आता थेट अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत खेळणार आहे. नोवाक जोकोविच याने या आधीही कॅनडा मास्टर्स स्पर्धेतून दुखापतीमुळे माघार घेतली होती. अमेरिकन खुली स्पर्धा कोणत्याही प्रकारच्या वॉर्मअपशिवाय खेळण्याचा निर्णय त्याने घेतला आहे. याआधी तो २०२३ मध्ये सिनसिनाटी स्पर्धेत सामील झाला होता. त्यावेळी त्याने अंतिम सामन्यात अल्काराझचा पराभव करुन विजेतेपद राखले होते. जोकोविचचा खेळ पाहण्याची संधी आता २४ ऑगस्टपासून सुरु होणाऱ्या अमेरिकन खुल्या स्पर्धेत मिळणार आहे. दरम्यान यंदाच्या विम्बल्डनमध्ये अजिंक्यपद पटकावणारा जेनिक सिनर सिनसिनाटीत पोहोचला आहे. त्याच्याबरोबर कार्लोस अल्काराझ आला असून सिनसिनाटीमध्येही काही चांगल्या लढती पाहण्याची संधी क्रीडारसिकांना मिळण्याची शक्यता आहे.

## क्रिकेट गुणतालिकेत भारत तिसऱ्या स्थानी

■ लंडन

अँडरसन - तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत इंग्लंडबरोबर साधलेल्या गुणांच्या बरोबरीमुळे भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ओव्हल इथे झालेल्या या कसोटी सामन्यापूर्वी इंग्लंड गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर होता. भारतीय संघ आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ या गुणतालिकेत आघाडीवर आहे.


## बीसीसीआय खेळाडूंच्या वयाची द्विस्तरीय तपासणी करणार

■ मुंबई

विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंचे निश्चित वय कळावे यासाठी बीसीसीआय प्रत्येक खेळाडूच्या वयाची द्विस्तरीय तपासणी करणार आहे. त्यासाठी एक बाह्य संस्था नेमण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून त्यासाठी निविदा मागवल्या आहेत. बीसीसीआय यातील पहिल्या स्तरात खेळाडूंचे वय त्यांच्या कागदपत्रांच्या व इतर दस्तावेजांच्या सहाय्याने तपासणार असून दुसऱ्या स्तरात खेळाडूंच्या अस्थी परीक्षणाने त्यांचे निश्चित वय मोजले जाणार आहे. १६ वर्षांखालील मुलांसाठी व १५ वर्षांखालील मुलींसाठी ही तपासणी केली जाते. हे काम आता बाह्य संस्थेला देण्यात येणार आहे. निविदा मागवताना बीसीसीआयने काही अटीही ठेवल्या असून संस्थेला अशाप्रकारे वयपडताळणीचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.

## बंगळुरु फुटबॉल क्लबच्या पहिल्या संघाला वेतन नाही

■ बंगळुरु



बंगळुरु शहर फुटबॉल क्लब बीएफसीने आपल्या पहिल्या संघातील खेळाडूंना व कर्मचाऱ्यांना अनिश्चित काळासाठी वेतन न देण्याचा निर्णय घेतला आहे. इंडियन सुपर लीगच्या अनिश्चितते मुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या खेळाडूंमध्ये सुनिल छेत्री याचाही समावेश आहे. बीफएसी ने काल जारी केलेल्या एका निवेदनात ही माहिती दिली. जेएसडब्लू ची मालकी असलेल्या क्लबने म्हटले की, देशात फुटबॉल क्लब चालवणे सुरुवातीपासूनच आव्हानात्मक आहे. आम्ही प्रत्येक मोसमात नुकसान सहन केले आहे. आम्ही खेळाडू व कर्मचाऱ्यांच्या संपर्कात असून यावर काही तोडगा काढण्याचा विचार करत आहोत. मात्र सध्या तरी या खेळाडूंना अनिश्चित काळासाठी वेतन देणे शक्य होणार नाही.

## खार जिमखाना क्रिकेट स्पर्धा स्वामी विवेकानंद स्कूल विजयी

■ मुंबई

मुंबईच्या खार जिमखान्यात झालेल्या सेठ गोरधनदास करसोंडास चॅलेंज शील्ड आणि भागुभाई खिचडिया-खार जिमखाना १६ वर्षांखालील आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत गौड युनियन स्पोर्ट्स क्लब आणि बोरीवली येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलने विजेतेपद पटकावले. भागुभाई खिचडिया-खार जिमखाना स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलने पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम) संघाला हरवले. स्वामी विवेकानंदांच्या यशात महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या यश दुसी याला स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाज म्हणून गौरविण्यात आले. सेठ गोरधनदास करसोंडास चॅलेंज शील्ड स्पर्धेत गौड युनियन स्पोर्ट्स क्लबने बाजी मारली. त्यांना ५० हजार रुपयांचा धनादेश आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली. उपविजेत्या विरारच्या अवर्स सीसी ३० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावर्षी खार जिमखान्याच्या माजी क्रिकेटपटूंच्या कुटुंबियांनी सर्वोत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्तम गोलंदाज आणि सर्वोत्तम ऑलराउंडर अशी सहा बक्षिसे प्रायोजित केली होती.

## एमएसएसए आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मोठी चुरस

■ मुंबई

ड्रीम स्पोर्ट्स एमएसएसए आंतरशालेय फुटबॉल १६ वर्षांखालील मुले डिव्हिजन वन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत बुधवारी डॉन बॉस्को स्कूलच्या माटुंगा आणि बोरिवली स्कूलसमोर अनुक्रमे, कॅथेड्रल अँड जॉन कॅनन स्कूल (फोर्ट) तसेच एव्हीएम, जुहू संघांचे आव्हान आहे. वांद्रे येथील विंग्स स्पोर्ट्स सेंटर येथे सुरू असलेल्या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत डॉन बॉस्को बोरिवली संघाने आरव कटारियाच्या दोन गोलच्या जोरावर सेंट स्टॅनिस्लॉस, वांद्रे संघावर २-० असा विजय मिळवला. अन्य सामन्यांत, कॅथेड्रल आणि जॉन कॉनन संघाने सेंट जोसेफ सेकंडरी, मालाड संघावर ३-१ अशी मात केली. त्यात अर्णव सिंग, रियान उनियाल आणि अनाई डिसोझाचे गोल महत्वपूर्ण ठरले. सेंट जोसेफ संघाकडून एकमेव गोल अयान मनियारने केला.

## विजयाचा शिल्पकार मोहम्मद सिराजवर कौतुकाचा वर्षाव

■ लंडन



भारत विरुद्ध इंग्लड मधील पाचव्या कसोटी सामन्यात विजयश्री खेचून आणणाऱ्या मोहम्मद सिराजवर जगभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. इंग्लड दौऱ्यासाठी त्याने घेतलेली मेहनत व कठोर आहारनियंत्रणामुळेच त्याला हा चमत्कार करणे शक्य झाल्याचे त्याच्या निकटवर्तीयांनी म्हटले आहे. सिराजच्या कुटुंबियांनी म्हटले की, तो प्रत्येक दौऱ्यावर जाण्याआधी आप्या वडीलांच्या समाधीस्थळी जातो व परत आल्यावरही तिथेच जातो. सिराजच्या वडीलांचे २०२१ मध्ये निधन झाले होते. रिक्षा चालक असलेल्या त्याच्या वडीलांचा त्याच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा होता. सिराजने शेवटच्या सामन्यात ९ बळी घेतले. इंग्लंडचा शेवटचा बळी घेत संघाला विजयी केलेला क्षण अनेकांनी पुन्हा पुन्हा पाहिला. विक्रमवीर सुनील गावस्कर यांनी या विजयानंतर आपले खास नृत्य सादर केले तर मास्टरब्लास्टर सचीन तेंडूलकर याने या विजयासाठी संघाला दहा पैकी दहा गुण दिले. भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याने म्हटले आहे की, सिराज सारखा गोलंदाज आपल्या संघात असणे हे प्रत्येक कर्णधाराचे स्वप्न असते. दरम्यान सिराजने म्हटले की, मी सकाळी उठून आरशात पाहिले तेव्हाच हे ठरवले होते की मी आज काही ना काही करणार. मोहम्मद सिराजने दुसऱ्या डावात इंग्लंडचा अर्धा संघ तर तंबुत पाठवलाच त्याचबरोबर ऐन वेळी शेवटचा बळीही पटकावला.

**मराठी रंगभूमीवर वादग्रस्त म्हणून गाजलेले आणि मराठी नाटकांना एक नवा आकृतीबंध देणारे नाटक म्हणजे 'घाशीराम कोतवाल'. बावन्न वर्षांपूर्वी पुण्याच्या पी.डी.ए. तर्फे डॉ. जब्बार पटेल यांनी विजय तेंडुलकर लिखित हे 'ऐतिहासिक व्यक्तिरेखांवरील अनैतिहासिक नाटक' रंगमंचावर आणले, तेही कृष्णदेव मुळगुंद यांचे नृत्य दिग्दर्शन आणि भास्कर चंदावरकर यांचे संगीत याचे दागिने लेवून. उत्तर पेशवाईतील एका घटनेवर आधारित हे नाटक सत्ताकारणाचा पट उलगडणारे राजकीय नाटक आहे की इतिहासातील विशिष्ट व्यक्तिमत्वांची बदनामी करण्यासाठी रचलेले कथानक आहे? यावरून तेव्हा वादाचा मोठा भडका उडाला होता. परंतु काही काळाने हे नाटक सादर करणारी मुळ संस्थाच या नाटकामुळे फुटली आणि जब्बार पटेलांच्या नेतृत्वाखाली थिएटर अकादमी स्थापन झाली. मग अकादमीने घाशीरामचे प्रयोग युरोप, अमेरिकेसह अन्य ठिकाणीही केले. हा सगळा इतिहास पाठीशी असलेला घाशीराम आता नव्या संचात, नव्या ढंगात, नव्या रंगात पुन्हा एकदा रंगमंचावर येत आहे आणि हे घाशीराम हिंदी भाषेत आहे. साहजिकच सर्व नाट्य रसिकांचे या घासीरामच्या एंट्रीकडे लक्ष लागलेले आहे. काय आहे या नव्या घाशीरामचे वैशिष्ट्य? आज हे नाटक पुन्हा का करावसं वाटतंय? काय वेगळं आहे या नवीन प्रयोगात? हे जाणून घेण्यासाठी 'घासीराम'च्या ठाण्याच्या आनंद विश्व गुरुकुलच्या अंगणात सुरु असलेल्या तालमीलाच भेट दिली.**

# येत आहे हिंदी 'घासीराम'

## संजय मिश्रा साकारणार नाना फडणवीस

नाट्यजत्रा
मकरंद जोशी

नव्या हिंदी घासीराम ... नव्हे, घासीराम कोतवाल चा दिग्दर्शक अभिजीत पानसेचे नाव 'रेगे' आणि 'ठाकरे' हे चित्रपट व रानबाजार या वेब सिरीजमुळे वलयांकित झाले असले तरी तो मुळचा नाटकवालाच आहे. पण कलासृष्टीबरोबरच 'राज'कारणातही कार्यरत असलेल्या अभिजीतला आत्ताच घासीराम का करावसं वाटलं? यावर अभिजीत म्हणाला, मी भालचंद्र कुबल यांना वेगळ्याच प्रकल्पासाठी भेटलो तेव्हा हिंदी घासीराम चा विषय निघाला. पूर्वी कुबल यांनी त्याचे काही प्रयोग केले होते. मी ठाकरे हा सिनेमा केला तेव्हा हा सर्व इतिहास माहिती करून घेतला होता. पण मी घासीराम पाहिलेले नाही. मात्र घासीराम चं हिंदी पुस्तक वाचलं तेव्हा लक्षात आलं की, हे आजच्या काळाचं नाटक आहे. ज्यांनी मराठीतलं घासीराम पाहिलेलं आहे, त्यांना तो प्रयोग, त्यातले ते पगड्या घालून तालबद्ध हालचाली करणारे पुण्याचे 'बामण हरी' आठवत असतीलच. इथे हिंदी घासीराम ची तालीम बघताना काही वेगळंच दिसत होतं. त्यामुळे या नव्या हिंदी नाटकात तू नेमकं काय आणि का बदललं आहेस? या प्रश्नाचं उत्तर देत अभिजीत म्हणाला की, तेंडुलकरांची संहिता मुळात सार्वकालिक आहे. ती एका विशिष्ट काळात घडलेल्या कथेवर आधारित असली





तरी सत्तेच्या सारीपाटाचा हा खेळ जगभरात सुरू असतो आणि वेगवेगळ्या काळात तो घडताना दिसतो. उदाहरणार्थ, अमेरिकेने आधी अफगाणिस्तानातला दहशतवाद पोसला व त्यातून मग ओसामा बिन लादेन उभा राहिला, ज्याला पुढे अमेरिकेनेच संपवलं. आपल्या देशात अगदी महाराष्ट्रातही अशी उदाहरणे आहेतच. त्यामुळे हे सार्वकालिक नाटक सादर करताना मी ते आजच्या काळातल्यासारखं सादर करायचं ठरवलं. खरंतर, एखाद्या कवितेत जशी चाल लपलेली असते, तसं या नाटकाच्या संहितेत त्याच्या सादरीकरणाचं रूप लपलेलं आहे. एखाद्याला एक चाल सुचेल, दुसऱ्याला दुसरी; तशी मला घासीरामची सापडलेली चाल जब्बार सरांपेक्षा वेगळी आहे. जब्बार पटेल यांच्या दिग्दर्शकीय कामगिरीचा मी आदर करतो. त्यांच्याशी माझी तुलना होऊच शकत नाही. पण हा मला दिसलेला, जाणवलेला घाशीराम आहे. आणि म्हणून तो वेगळा आहे. संजय मिश्रांच्या निवडीविषयी सांगायचं तर ते स्वतः हिंदी असल्याने संहितेतील भाषेचं वजन ते उत्तम पेलतील याची खात्री होती. त्यांचा अनुभव आणि नाटकाविषयीचं त्यांचं प्रेम याचा दुहेरी फायदा नाटकाला होईल. नव्या ढंगात सादर होणाऱ्या घाशीराममध्ये नृत्य हे महत्वाचे आहेच. मूळ नाटकात तेंडुलकरांना अभिप्रेत असलेला दशावतारी खेळ्यांचा आकृतीबंध कृष्णदेव मुळगुंद यांनी अचूक पकडला होता. त्यामुळे पारंपारिक पोशाखातली ती पगडीधारी माणसांची भिंत, बावनखणीपासून ते कोतवालांच्या गस्तीपर्यंतचे प्रसंग उभे करताना वापरलेले आकृतीबंध यातून जो परिमाण साधला जात असे. त्यामुळे आजच्या काळातील घासीराम दाखवताना सुध्दा पारंपारिक नत्याचा बाज कायम ठेवला असून या हिंदी नाटकात दोन लावण्या पहायला मिळतील.

घाशीरामच्या या प्रयोगाचं मुख्य आकर्षण ठरणार आहेत ते अर्थातच नाना फडणविसांच्या भूमिका करणारे संजय मिश्रा. एन.एस.डी.मध्ये प्रशिक्षण घेऊन बॉलिवूड मध्ये कारकिर्द घडवणारे संजयजी सुमारे ३० वर्षांनी रंगभूमीवर पुन्हा पदार्पण करत आहेत. घाशीराम कोतवाल मधील डॉ. मोहन आगाशेंचा नाना फडणवीस नाट्य रसिकांच्या आजही स्मरणात आहे. त्यामुळेच संजयजींचा नाना कसा असेल, ही उत्सुकता आहे.

नाटकाच्या तालमीच्या ठिकाणी संजयजी आपलं बुजुर्गपण बाजूला ठेवून सगळ्या टीमबरोबर मिसळलेले दिसत असले तरी सगळे त्यांना आदराने 'गुरुजी' म्हणून संबोधत होते. गुरुजींना विचारलं की, नाना फडणवीसांची ही ऐतिहासिक भूमिका आपण कशामुळे स्वीकारली? तर ते म्हणाले, मी जेव्हा नाटक वाचलं, तेव्हा लक्षात आलं की नाना




फडणवीस ही फक्त ऐतिहासिक व्यक्तिरेखा नाही, तर ती एक प्रवृत्ती आहे. तेंडुलकरजींनी इतिहासाच्या पानांमध्ये या व्यक्तिरेखेतील ती मनोवृत्ती दाखवली आहे, जी कोणत्याही कालात, जगातील कोणत्याही देशात आढळते. त्यामुळे मला वाटतं की हे नाटक म्हणजे समाजासमोर ठेवलेला आरसा आहे. त्यामुळे हे नाटक नवीन पिढीला दाखवायलाच हवं. एका अर्थाने, ते तुमच्या अवतीभोवती घडणाऱ्या राजकारणाची कडू जाणीव तुम्हाला करून देतं. अशा नाटकातील भूमिका नाकारण्याचा प्रश्नच नव्हता.

तेंडुलकरांचा नाना साकारण्यासाठी काय तयारी केलीत? या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केलं की, नाना फडणवीस या व्यक्तिरेखेचे अनेक पदर आहेत. नाटकाच्या तालमी सुरू झाल्यावर मला ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली. या कथानकाची सार्वकालिकता अधोरेखित करणे हाच आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे मला एक नट म्हणून मजा येत आहे.

इतक्या वर्षांनी रंगभूमीवर पुन्हा एकदा पदार्पण करताना काय भावना आहेत? यावर संजय मिश्राजी म्हणाले, चित्रपटाची गोष्ट वेगळी असते. नाटक म्हणजे जीवंत अनुभव. त्यामुळे मी पुन्हा एकदा तो अनुभव घ्यायला उत्सुक आहे. मी एन.एस.डी.मध्ये असताना तिथे झालेला घाशीरामचा प्रयोग पाहिला होता. त्या प्रयोगाची आठवण आजही माझ्या मनात ताजी आहे. माझ्याकडे ही भूमिका आली तेव्हा मी ठरवलं की संधी सोडायची नाही.

तर मराठीतले एक अभिजात नाटक घासीराम कोतवाल व्दारे आता अमराठी प्रेक्षकांपर्यंत अत्यंत दिमाखदार पद्धतीने पोहोचेल, यात शंकाच नाही.



# सलमानचा मल्याळम दिग्दर्शकासह शेक हॅण्ड

सिकंदरच्या अपयशानंतर सलमान खान हिरो म्हणून बाद झाला आहे आणि त्याला नवे चित्रपट मिळवणे कठीण आहे, असे बोलले जात असतानाच अचानक तो 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटामध्ये काम करण्याची बातमी समोर आली. या सिनेमासाठी आपल्या वाढलेल्या वजनावर आणि गेलेल्या चार्मवर सलमान खूप मेहनत घेत असल्याच्या बातम्या देखील समोर आल्या होत्या. आता सलमानसंदर्भात आणखी एक बातमी समोर आली आहे की 'बॅटल ऑफ गलवान' नंतर सलमान एका पीरियड थ्रिलर चित्रपटात काम करत आहे आणि त्यासाठी सलमानने एका मल्याळम दिग्दर्शकासह हात मिळवला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सलमान व मल्याळम दिग्दर्शक महेश नारायणन यांच्या आत्तापर्यंत चार भेटी झाल्या आहेत आणि दोन दिवसांपूर्वीच सलमान व महेश नारायणनची आणखी एक भेट झाली. दोघांमध्ये चित्रपटाचा विषय, भूमिका व सादरीकरण याविषयी गहन चर्चा सुरु आहे. या चित्रपटाचा विषय पीरियड थ्रिलर आहे. याखेरीज सलमान दिग्दर्शक कबीर खानसह देखील चित्रपट करणार असल्याची बातमी आहे.

# संजयचा प्रॉपर्टी वाद



बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचा माजी पती संजय कपूरचे नाव त्याच्या निधनानंतर देखील चर्चेत आहे, कारण त्याच्या एम्पायर सोना कॉमस्टर या व्यवसायाच्या ३० हजार कोटींच्या संपत्तीच्या वाटपाचा वाद आहे. याप्रकरणी संजयची आई आणि सोना कॉमस्टरच्या माजी अध्यक्ष राणी कपूर यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी अचंबित करणारे अनेक दावे केले आहेत. आता बातमी आहे की त्यांनी आपल्या मुलाच्या - संजयची हत्या झाली असल्याची शंका उपस्थित केली असून त्यांनी ब्रिटिश पोलीसांना याचा गुन्हेगारी तपास करण्याबाबत एक पत्र देखील लिहिले आहे. नक्की काय प्रकरण आहे? १२ जून रोजी संजय कपूरचे आकस्मित निधन होण्यापूर्वी त्याने त्याच दिवशी घडलेल्या अहमदाबाद विमान अपघाताविषयी सोशल मीडियावर एक ट्वीट केले होते आणि त्यानंतर काही तासातच त्याच्या मृत्यूची धक्कादायक बातमी समोर आली होती. आता या सर्व घटनेने एक वेगळेच वळण घेतले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार संजयच्या आईने - राणी कपूर यांनी ब्रिटिश पोलिसांना लिहिलेल्या पत्रामध्ये दावा केला आहे की, माझ्या मुलाच्या मृत्यूशी निगडीत अपस्पष्ट व रहस्यमय परिस्थितीचा बारकाईने तपास करण्यात यावा. राणी कपूर यांचे मत आहे की, संजयचे निधन नैसर्गिक आणि आकस्मित झाले नसून हे कटकारस्थानाअंतर्गत झाले आहे. मिसेस कपूरनी ब्रिटिश कायदा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी यात त्वरित हस्तक्षेप करावा अशी विनंती केली आहे. त्यांच्या दाव्यानुसार त्यांच्या मुलाच्या हत्येच्या पाठीमागे लबाडी आणि फसवणूक असल्याचा संशय आहे. यापूर्वी त्यांनी सांगितले होते की, मी आता वृद्ध झाले असून माझ्या मुलाला काय झाले हे मला माहित नाही. मरण्यापूर्वी याबाबत मला स्थिरता हवी आहे.अर्थात, संजयची ३० हजार कोटींची मालमत्ता हेच या सर्व घटना, दावे, भांडणे आणि शंका कुशंकांचे मूळ कारण आहे.

# जनाईचा भाऊ सिराज?





भारतीय क्रिकेट संघातील स्टार गोलंदाज मोहम्मद सिराजने क्रिकेटमध्ये जितके नाव कमावले आहे, तितकेच आपल्या व्यक्तिगत जीवनाविषयी, त्याच्या कथित प्रेमप्रकरणांविषयी देखील तो कायम चर्चेत असतो. अर्थात, त्याने कधी त्याच्या कथित प्रेमप्रकरणांबद्दल कुठलेही वक्तव्य अद्याप केलेले नाही. सिराजचे नाव टीव्ही अभिनेत्री माहिरा शर्मासह जोडले गेले होते. नुकतीच इंग्लंडच्या विरोधात कमालीची गोलंदाजी केली. त्याच्या या जबरदस्त खेळावर आशा भोसले यांची नात जनाई भोसलेने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर सिराजचे कौतुक करणाऱ्या अनेक पोस्ट शेअर करत त्याला एक उत्तम खेळाडू असल्याचे सांगितले आहे. तिने सिराजला स्टार आणि चॅम्पियन अशा उपाधी दिल्या आहेत. सिराज व जनाईच्या प्रेमप्रकरणाच्या चर्चांना गेले अनेक दिवस सुरु आहेत. परंतु जनाईने एका नव्या पोस्टमध्ये सिराजला भाई म्हटले आहे. त्यामुळे आता त्यांच्या प्रेमप्रकरणाच्या चर्चेला पूर्णविराम मिळेल अशी आशा आहे.

# येत आहे कोर्टरूम ड्रामा




चित्रपटांमध्ये कोर्टरूम ड्रामा अनेक वर्षांपासून प्रेक्षकांना पहायला मिळत आहे. परंतु सीरिजमध्ये देखील आता कोर्टरूम ड्रामा बघायला मिळतो, आणि प्रेक्षकांना तो पहायला खूप आवडतो. मग त्या सीरिजचे स्वरूप कायदेविषयक थ्रिलर असो, कॉमेडी असो किंवा रोमँटिक. याच विषयावरील 'कोर्ट कचहरी' ही नवी सीरिज येत आहे, ज्याचा मजेदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. इतकेच नाही तर या सीरिजच्या प्रदर्शनाची तारीखसुद्धा घोषित करण्यात आली आहे. दिग्दर्शक अरुनभ कुमार आणि रुचिर अरुण यांची जोडी ही सीरिज घेऊन येत आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म सोनी लिववर १३ ऑगस्टपासून ही सीरिज तुम्हाला पहायला मिळेल. या सीरिजच्या ट्रेलरमध्ये अनेक विनोदी पंचलाइन आणि रंजक कथेची झलक बघायला मिळेल. कोर्ट कचहरी ची कथा आहे परम नावाच्या एका व्यक्तीची, ज्याचे वकील आहेत. आपल्या पूर्वजांच्या पाऊलावर पाऊल टाकत तो देखील वकील बनतो, परंतु कथेमध्ये ट्विस्ट येतो, जेव्हा त्याला या व्यवसायात स्वारस्य नसताना देखील घरच्यांच्या दबावाखाली हा पेशा करावा लागतो. सीरिजच्या ट्रेलरमध्ये एक संवाद आहे की, 'बाप की हसरतों में बर्बाद बेटे की जवानी' (वडिलांच्या इच्छेखातर मुलाचे तारुण्य बरबाद) या संवादामध्येच प्रेक्षकांना कथेची हिंट देण्यात आली आहे. या सीरिजमध्ये आशिष वर्मा, पुनीत बत्रा आणि पवन मल्होत्रा आदी कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.

# प्रियंका प्रति रेखा?




बिनधास्त देसी गर्ल प्रियांका चोप्रा, लारा दत्ता आणि अक्षय कुमार अभिनित अंदाज हा चित्रपट २२ वर्षांपूर्वी २००३ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील दर्शन यांनी केले होते. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सुनील दर्शन यांनी प्रियंकासह झालेली त्यांची पहिली भेट आणि तिला बघून त्यांची पहिली प्रतिक्रिया काय होती याविषयी सांगितले आहे. ते म्हणाले की, प्रियांका तिचा मॅनेजर प्रकाश जाजूसह माझ्या ऑफीसमध्ये मला भेटायला आली होती. तिला बघितल्यावर मला ती करिश्मा कपूर किंवा करीना कपूरसारख्या हिरॉईनप्रमाणे वाटली नाही, तर एका सर्वसामान्य मुलीसारखी वाटली. तिने मला सांगितले की, ती मिस वर्ल्ड विजेती आहे. आमचे संभाषण सुरू असताना मला तिचा आवाज खूप आवडला. पंधरा मिनिटे मी हाच विचार करत होतो की, ती हिरॉईन कशी होऊ शकेल. मग मला वाटले की, ती एकदम रेखाजींसारखी आहे, त्यामुळे ही उद्याची रेखा बनू शकते. अंदाज मध्ये प्रियंका चोप्राने दुय्यम भूमिका केली होती. तरीही तिचा अभिनय प्रेक्षकांना आवडला होता.

# तेरे नाम मधील ही भिकारी बनली निर्माती

बॉलीवूडचा स्टार सलमान खानने आत्तापर्यंत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. मात्र त्याच्या सर्वाधिक लोकप्रियता मिळालेल्या चित्रपटांच्या यादीमध्ये तेरे नाम आणि बजरंग भाईजान यांचा क्रमांक वर आहे. तुम्हाला २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या तेरे नाम मधील एका भिकारी मुलीची व्यक्तिरेखा आठवते का? तिचे नाव असंख्य प्रेक्षकांना माहिती नसणार. या बातमीमध्ये तिचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे ती आता स्टार बनली आहे. तेरे नाम हा चित्रपटच तिच्या अभिनय कारकिर्दीमधील टर्निंग पॉईंट बनला होता. त्यानंतर तिने अनेक मोठ्या चित्रपटांमध्ये काम केले. त्या अभिनेत्रीचे नाव आहे राधिका चौधरी. तिची भूमिका या सिनेमामध्ये भले लहान असली तरी तिची ही भूमिका प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करून गेली होती. सलमानसुध्दा सिनेमामध्ये या व्यक्तिरेखेविषयी भावनात्मक जोडलेला आहे असे दाखवण्यात आले होते. तर अशा या राधिकाने चित्रपटसृष्टीमध्ये दिग्दर्शिका आणि निर्माती म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. हेच कारण आहे की, अभिनय सोडल्यानंतरही ती चित्रपटजगताशी जोडलेली आहे. राधिकाचा तेरे नाम मधील लूक आणि वर्तमान लूक यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. तेरे नाम नंतर तिने कुठल्याही चित्रपटात काम केले नसले तरी २००४ पर्यंत दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये तिचा दबदबा राहिला. त्यानंतर सहा वर्षांचा ब्रेक घेतल्यानंतर राधिकाने चित्रपटांचे दिग्दर्शन व निर्मिती करण्यास सुरुवात केली. २०१० मध्ये तिने ऑरेंज ब्लॉसम हा लघूपट बनवला आणि त्यासाठी तिला लास वेगास येथील चित्रपट महोत्सवामध्ये पुरस्कार देखील मिळाला. याचबरोबर २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या आमिर खानच्या 'लाल सिंह चड्ढा' या चित्रपटासाठी राधिका कार्यकारी निर्माती म्हणून काम करत होती.



# नवाकाळ शब्दकोडे-१३३४



**आडवे शब्द –**

२. लोकप्रियता, बरकतीचा काळ ४. मतैक्य ७. सावळा आणि देखणा- श्रीकृष्ण ११. स्वतःच्या सौंदर्याचा अभिमान असलेली १४. फळाच्या अपेक्षेने केलेले व्रत १६. देव, ईश्वर १८. अभिप्राय १९. ताजा, प्रसन्न २२. साय २४. वन्य पशू २५. वनराज २६. ढगळ अंगरखा २८. सहावी तिथी २९. वंश ३०. क्षुद्र, बिनमहत्त्वाचे ३१. तरतरी आणणारे एक घरगुती पेय ३२. फुकट ३३. तिरळा ३४. उष्णता, झळ ३५. कौतुक, स्तुती ३७. वेखंड ३८. लहान वस्ती, पाडा ३९. गुन्हा ४१. पुढारी ४२. वेगळे होणे ४५. बाळाची काळजी घेणारी सेविका ४६. सोन्याचे चपटे तुकडे गुंफलेला अनेकपदरी हार ४८. कंटाळवाणे ५०. रेडिओवरची नाटिका ५३. मीठ, लवण ५५. एक पौष्टिक डाळ, माष ५७. वाटेतली अडचण दूर करणे ६०. वाईट गोष्टीची सवय, व्यसन ६२. जहाजांचे स्थानक ६३. शिशू, बालक ६४. इमारतीच्या पायातले ओबडधोबड दगड ६६. उद्यान ६७. श्रीमंत, मालदार ६९. मफलर ७०. संताप, राग ७३. गूढ, खोल ७४. टंचाई ७७. कामसू ७८. निर्विकल्प, शुद्ध ८०. कौतुक, भलावण ८२. वाट चुकलेला, पतित ८४. ज्यूटचे कापड ८५. अवघड योगासनविशेष (खाली डोके वर पाय) ८६. कमळ ८८. कोंडा, भूस ८९. पवित्र, शुभ ९१. गोडीगुलाबीचा उपाय ९२. नृत्य ९३. कापडाचे अखंड ठाण ९५. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पुण्या-मुंबईजवळचे एक ९८. अश्व, घोडा १००. कपाळ १०२. तऱ्हा, पद्धत १०३. कैची १०५. श्रीकृष्णाचे एक नाव १०६. सख्खे भावंड १०७. घाव, जखम १०८. घुंगरू १०९. आज्ञेचे पालन करणारा

**उभे शब्द –**

१. गुळाची भेली २. निरर्थक काथ्याकूट ३. वेल, वल्लरी ५. उपस्थिती ६. महिन्यातील सरासरी दिवस ७. सावळा रंग ८. दोरखंड ९. धोंडा १०. जाडसर दळलेले गहू ११. प्रथा, परंपरा १२. जाणे, प्रयाण १३. हिरण्यकश्यपूला मारण्यासाठी विष्णूने घेतलेला अवतार १५. यकृताचा मोठा आजार, कावीळ १७. सहदेवाचा सख्खा भाऊ २०. युद्धबंदी २१. धडाडीने कामे करणारा २३. इच्छा, आस २४. जंगलात पसरलेली आग २७. स्थिती, होऊन गेलेले २९. काम टाळणे, अंगचोरपणा ३३. काटकी ३४. संकट, अरिष्ट ३६. विश्वसनीय ३८. वायू ४०. विवेक, तारतम्य ४२. नांगराचे पाते ४३. कडक शिस्त ४४. अटकाव, विरोध ४७. श्रावणी पौर्णिमेचा सण ४९. कुलूप ५१. कंटक ५२. परिधान करणे ५४. दात ५५. खुलासा ५६. दबाव ५८. अतिशय कष्ट, राबणूक ५९. मेघ ६१. गुंड, टर्रेबाज ६५. कलंक ६७. सोशिक स्वभाव ६८. लोकरीचे वस्त्र ७१. जाणूनबुजून ७२. महिला ७३. हत्ती ७४. वादळ ७५. पोशाख ७६. संप्रदाय ७९. नाटकाचे स्टेज ८०. फर्निचरसाठीचे भक्कम लाकूड, रोजवुड ८१. लहान ८२. सर्वोच्च, अंतिम ८३. गैरव्यवहार, अनाचार ८७. कारकून ९०. अंधाराचा शत्रू ९२. अनुत्तीर्ण ९४. देवळाचा मुख्य अंतर्भाग ९६. भीष्माचे वडील ९७. रडगाणे, नकाराचा सूर ९८. कंडक्टर ९९. हर्ष, आनंद १०१. एक लाख १०४. बिशाद, हिंमत १०५. मयूर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३३चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. सख्य ३. आशीर्वादि ६. नाम ८. आमदनी ११. लताकुंज १३. विमल १४. यक्षकर्दम १७. हारा १८. जगरहाटी २०. पुनीत २१. नखरेल २४. काहूर २६. हर २८. यजन ३०. रव ३१. फोल ३२. हास्य ३३. जहाज ३५. टीका ३७. तीज ४०. परमधाम ४२. वाटप ४४. तर्र ४५. टिंबर ४७. यव ४८. सान ४९. चपळ ५१. वरकस ५३. गळ ५५. पदार्थ ५६. शिकारा ५७. मान ५८. टाळाटाळ ६०. कमला ६२. भर ६४. श्रीनिवास ६७. अळी ६९. व्यवसाय ७०. तान ७१. जग ७२. गट्ट ७३. माथा ७४. करगोटा ७६. कसूर ७८. टवळी ७९. स्वर्ग ८१. उषा ८२. याचक ८३. सकवार ८५. कृष्णद्वैपायन ८९. तन ९०. सपाता ९१. थकवा ९३. पडता काळ ९८. नाताळ ९९. सल १००. नीर १०१. सुळसुळाट १०४. वचपा १०५. खर १०६. मेजवानी १०८. सखा ११०. सचित ११३. तारीख ११४. सातत्य ११५. खरचटणे ११६. चराचर

**उभे शब्द** : १. माता २. सजग ३. आमटी ४. शील ५. दयनीय ६. नाक ७. मर्दन ९. महाल १०. दरा ११. लटका १२. कुंजर १३. विहार १५. क्षतज १६. मखर १९. रहस्यमय २२. रेवती २३. दिलखुलास २५. हूड २७. गुहा २९. नटी ३२. हार ३३. जम ३४. जवान ३६. कातळ ३८. जहर ३९. धटिंगण ४०. पर ४१. धावपळ ४३. पचका ४६. बळ ४८. सार्थक ५०. पराभव ५१. वनश्री ५२. कडवा ५४. आळा ५६. शिला ५८. टाळी ५९. टारगट ६१. मती ६३. रसाळ ६५. निहार ६६. सराटा ६७. अनसूया ६८. आगळीक ६९. व्यथा ७०. ताक ७२. रवसड ७३. मार्ग ७४. कषाय ७५. गोट ७७. रचयिता ७८अ. वसन ७९. स्वर ८०. उष्णता ८१. उपासतापास ८४. वाट ८५. कृपाळू ८६. नथ ८७. सवाल ८८. गोपनीयता ८९. तळ ९२. कसर ९४. डर ९५. काळीज ९६. खेळ ९८. नाच १००. सुनीत १०२. सुत १०३. टसर १०५. खतरा १०६. मेख १०७. वासा १०९. खाच १११. चिंच ११२. चोर

# गडचिरोली-विट्यातून वनतारामध्ये नेलेले हत्ती गायब झाले! राजू शेट्टींचा आरोप

पान १ वरून

करून आम्हाला हत्ती पाहिजे म्हणून तिला घेऊन जाणारे खोटे आहेत. यावर सरकारने वनताराकडून उत्तर मागावे, अशी मागणी आम्ही केली. पेटा ही संस्था आर्थिक अमिषापोटी वनतारा येथे पाळीव हत्ती पोहोचवण्याची सुपारी घेत आहे. गडचिरोली येथील हत्ती संगोपन केंद्रातील काही हत्ती वनतारा येथे हलवले आहेत. त्याचप्रमाणे विटा येथील श्री नाथ मठातील एक हत्ती २०२३ साली वनतारा येथे हलवण्यात आला. मात्र, त्यांच्या बाबतीत कोणतीही ठोस माहिती, व्हिडिओ किंवा आरोग्य अहवाल उपलब्ध नाही. ही गोष्ट अत्यंत संशयास्पद आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील सांगितले की, ३ ते ४ हत्ती वनतारामध्ये नेले गेले असून, आता ते हयात नाहीत. जर महादेवी हत्तीणीची तब्येत सुधारत चालल्याचे व्हिडिओ वनतारा प्रसारित करू शकतो, तर इतर हत्तींबाबत माहिती का लपवली जाते? न्यायव्यवस्थेची दिशाभूल करून हत्ती महाराष्ट्राबाहेर नेले जात आहेत. ही बाब केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. त्रिपुरा, आसामसारख्या सीमावर्ती राज्यांतील हत्तींनाही लक्ष्य केले जात आहे. पेटा आणि वनतारा या संस्था प्राण्यांचा छळ करत आहेत.

**महादेवी हत्तीणीसाठी सरकार याचिका करणार**

माधुरी उर्फ महादेवी हत्तीणीसाठी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. फडणवीस म्हणाले की, माधुरी उर्फ महादेवी हत्तीण गेली ३४ वर्षे नांदणी मठात आहे. ती हत्तीण पुन्हा मठात यावी, ही आपल्या सर्वांची इच्छा आहे. यासाठी नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी आणि राज्य सरकार हस्तक्षेप करील. राज्य सरकारकडून हत्तीणीची निगा राखण्यासाठी डॉक्टरांच्या समावेशासह विशेष टीम तयार केली जाईल. तिच्या आरोग्याची, आहाराची आणि निवाऱ्याची संपूर्ण काळजी घेतली जाईल. रेस्क्यू सेंटर, आहार, आरोग्य या सर्व बाबतीत सर्वोच्च न्यायालयाला शासन आपल्या याचिकेतून आश्वस्त करील. सरकार नांदणी मठाच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे आहे.

# माजी राज्यपाल मलिक यांचे निधन

पान १ वरून

मलिक यांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. शेतकरी आंदोलनाला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला आणि सरकारच्या भूमिकेवर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. याशिवाय २०२३ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत मलिक यांनी २०१९ मधील पुलवामा दहशतवादी हल्ल्यावर गंभीर आरोप केले. त्यांनी हा हल्ला गंभीर गुप्तचर यंत्रणेच्या अपयशामुळे झाला असल्याचे सांगितले. सीआरपीएफने जवानांच्या हवाई प्रवासासाठी विमान मागितले होते.परंतु गृहमंत्रालयाने ती मागणी फेटाळल्याचा आरोप त्यांनी केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एनएसए अजित डोभाल यांनी त्यांना या प्रकरणावर मौन बाळगण्यास सांगितल्याचा दावाही त्यांनी केला होता.

# जिल्हा परिषदा व पालिका निवडणुकांत व्हीव्हीपॅट यंत्राचा वापर होणार नाही!

पान १ वरून

नागरिकांना ईव्हीएम कशी काम करते याची माहिती व्हावी यासाठी त्याचा डेमो दिला जातो. हा मुद्दा आता जुना झालेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशीनचा वापर केला जात नाही. कारण जर चार उमेदवार निवडायचे असतील, तर चार वेळा बीप देणे, प्रत्येक वेळी स्लिप यंत्रातून यावी लागणे, यामुळे मतदान प्रक्रिया फार वेळखाऊ होते. परिणामी मतदारांना रांग लांबत जाते. आजवर राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारित घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर झालेला नाही. यावेळी होणाऱ्या निवडणुकांसाठी ६२ ते ६५ हजार कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट आधीपासून राज्यात उपलब्ध आहेत. मात्र, यापेक्षाही मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री लागणार असल्याने अतिरिक्त युनिटची मागणी करण्यात आली आहे. इसीएल कंपनीकडे ५०,००० कंट्रोल युनिट आणि १,००,००० बॅलेट युनिटची ऑर्डर दिली आहे , पण ती यंत्रे ऑक्टोबरअखेरपर्यंत मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मध्यप्रदेश राज्य निवडणूक आयोगाशीही करार करण्यात आला आहे. त्यांच्याकडून २५,००० कंट्रोल युनिट आणि ७५ ००० बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाबाबत माहिती देताना वाघमारे म्हणाले की,एससी-एसटी आरक्षण निश्चित असते, परंतु ओबीसी आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार लॉटरी पद्धत अवलंबली जाणार आहे. मागील निवडणुकांमध्येही ओबीसी आरक्षण होते आणि यावेळीही तेच तत्त्व पाळले जाणार आहे. निवडणूक १ जुलै २०२५ पर्यंतच्या मतदार यादीच्या आधारावर घेण्यात येईल. प्रारूप रचना निश्चित झाल्यानंतर पुढील प्रक्रिया राबवण्यात येईल.

उबाठा नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, आयोगाने व्हीव्हीपॅट रद्द करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो अत्यंत तुगलकी पद्धतीचा आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे, ही आमची मुख्य मागणी आहे. यासाठी आम्ही ईव्हीएमला विरोध करत बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याची मागणी करत आहोत. अशा वेळी जेव्हा विरोधक पारंपरिक बॅलेटची मागणी करत आहेत, तेव्हा विद्यमान वीव्हीपॅट यंत्रणाही काढून टाकणे म्हणजे या निवडणूक प्रक्रियेवर जनतेने शंका घेण्याला वाव आहे.

# कबुतरखाने पुन्हा सुरू करणार

पान १ वरून

कबुतरखाने अचानक बंद करण्याऐवजी कबुतरांना कोणत्या वेळेत खाणे द्यावे आणि कोणत्या वेळेत देऊ नये याविषयी नियम तयार करता येतील.

कबुतरांमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करावा, टाटाची मशीन आहेत त्यांनी कबुतरखाने साफ करावे, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. यासंदर्भात माजी भाजपा नेत्या तथा माजी खासदार मनेका गांधी यांच्याशी चर्चा झाली आहे. उच्च न्यायालयात राज्य सरकार आणि महापालिकेने ठाम भूमिका मांडावी. पर्यायी व्यवस्था होईस्तोवर महापालिकेने कबुतरांना कंट्रोल फिडिंग करावे. यासंदर्भात गरज पडली तर राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाईल, असे फडणवीसांनी यावेळी सांगितले.

या बैठकीनंतर मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीसांनी बैठक घेतली आहे. महापालिकेला उच्च न्यायालयात जायला सांगितले आहे. कबुतरे मरू नयेत याची खबरदारी घेतली जाईल. यासंदर्भात कमिटी बनवली जाईल. मुख्यमंत्र्यांनी लोकांच्या भावना आणि १०० वर्षांची जुनी परंपरा लक्षात घेऊन हा निर्णय घेतला. आरोग्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. महानगरपालिका या सर्व नियमांची अंमलबजावणी करणार आहे. कबूतरखान्यांचे पाणी परत जोडले जाईल आणि बंद केलेले कबूतरखाने पुन्हा सुरू होतील. पर्यायी जागांचा विचारही केला जाईल. लोकांच्या जीवाचे महत्त्व सर्वात जास्त आहे, पण त्याचबरोबर कबूतरही मरू नये याचा समतोल साधण्याचा आदेश फडणवीसांनी महापालिकेला दिला आहे, हा निर्णय अतिशय समाधानकारक असून इतिहासात कायम राहील.

# मंत्री लोढांवर गंभीर आरोप

पान १ वरून- केल्या आहेत. ज्या फाईल अनेक दिवसांपासून मंजूर होत नव्हत्या त्या अचानक शेवटच्या दिवशी कशा मंजूर झाल्या? जिल्हाधिकाऱ्यांवर राजकीय दबाव आला का, याची चौकशी झाली पाहिजे. ते पुढे म्हणाले की, मंत्री मंगलप्रभात लोढा हे जिल्हाधिकाऱ्यांच्या घरी का गेले होते? ३० जुलैला त्यांनी दोन फाईल्सचे पैसे भरले, ३१ जुलैला त्यावर सह्या झाल्या. त्यासाठीच मंत्री लोढा त्यांच्या घरी गेले होते का? असे असल्यास त्यांनी मंत्रिपदाचा गैरवापर केला आहे. त्यांनी मंत्रिपदाचा गैरवापर केला असेल तर त्यांच्यावर कारवाई व्हावी. ठाणे ग्रामीण परिसरात लोढा डेव्हलपर्स आणि मायक्रोटेक हे मंत्री लोढा यांच्याशी संबंधित दोन कंपन्यांचे प्रकल्प सुरू आहेत. लोढा यांनी राजकीय दबाव वापरून या फाईल मंजूर केल्या का? मागील ८-१० दिवसांत त्यांच्या १३ फाईल वेगवेगळ्या विभागातून मंजूर झाल्याची माहिती आहे, याची निष्पक्ष चौकशी व्हावी.

## नोटीस

मयत कै. जगन्नाथ राजाराम दळवी. राहणार वरळी बि. डी. डी. चाळ यांचे रक्ताचे नोंदणीकृत वारसदार (पत्नी, मुले ई.)कोणी जर असतील त्यांनी खालील मोबाईल नंबर वरती पुढील 15 दिवसांच्या आत कॉल करून संपर्क साधणे.

**संपर्क : 8779655869** बीवायपी

# मेट्रो कामादरम्यान सळई डोक्यात घुसली

**मुंबई -** भिवंडीत ठाणे-भिवंडी- कल्याण या मेट्रो मार्गिकेचे काम सुरु असताना आज दुपारी कामावरील सळई रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षातील प्रवाशाच्या डोक्यात घुसली.यामध्ये प्रवासी गंभीर जखमी होऊन डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. पोलिसांनी जखमी प्रवाशाला खासगी रुग्णालयात दाखल केले.

## पुणे महानगरपालिका, पुणे

पुणे महानगरपालिका

**समाज विकास विभाग**

**निविदा जाहिरात - नवीन कामे**

विक्री कालावधी दिनांक : ०६-०८-२०२५ ते दि. १६/०८/२०२५

स्विकृती कालावधी दिनांक : ०६-०८-२०२५ ते दि. १६/०८/२०२५ तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १८-०८-२०२५

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव / संपूर्ण तपशिल | निविदा संच किंमत | जाहिरात रक्कम (जी. एस.टी. वगळून | बयाणा रक्कम १% | कामाची मुदत | मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०/२०२५ | पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग अंतर्गत बचत गटातील उत्पादित केलेल्या मालाचे परिमंडळ क्र. १ ते ५ येथे प्रदर्शन आयोजित करणे. | ६०७९/- | ८३,४४,७५०/- | ८३,५००/- | ०६ महिने | आहे |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून, सदर कामांचे निविदा संच **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदासंच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकांची राहील.

क) बयाणा रक्कम ऑन लाईन सुविधेमार्फत स्वीकारणेत येणार आहे तसेच बाकी सर्व मजकुर **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ड) निविदा विक्री कालावधी दिनांक व वेळ, निविदा स्विकृती कालावधी दिनांक व वेळ तसेच तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रियाचे दिनांक व वेळ **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जाहिरात क्र. २/५६३ दि. ०५/०८/२०२५

सही/-
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

## स्वामी समर्थ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

(नोंदणी क्र.: बी. ओ. एम./डब्ल्यु. जी./एन. आर.एस.आर./सी.आर./१४०१/१९८७-८८)
४०१-बी विंग, चौथा मजला, अशोका कॉम्प्लेक्स, रानडे रोड, दादर(प.), मुंबई-४०० ०२८
email: swamisamarthho@gmail.com

फक्त सभासदांसाठी

### ✻ ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ✻

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. बंकेश मोतीलाल गुप्ता** यांचे अध्यक्षतेखाली सूर्यवंशी सभागृह, तिसरा मजला, विर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८ येथे खालील कामकाजाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर हजर राहणे हि विनंती.

### ✻ सभेपुढील विषय ✻

१) दि. ०१/०९/२०२४ रोजी झालेल्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.
३) सन २०२४-२०२५ चा वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
४) सन २०२५-२०२६ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करुन त्याचा मेहनताना ठरविणे.
५) सन २०२५-२०२६ यावर्षासाठी निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनलमधील वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे व लेखापरिक्षकाच्या मानधनास मान्यता देणे.
६) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
७) मागील वर्षाच्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे, तसेच सन २०२५-२०२६ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
८) सन २०२३-२०२४ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
९) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जास मंजूरी देणे.
१०) पोटनियम दुरुस्ती स्वीकारून त्यास मंजूरी देणे.
११) संस्थेच्या नवीन शाखा विस्तारास मान्यता देणेबाबत.
१२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांना अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

स्थळ : मुंबई
दिनांक : ०६/०८/२०२५

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. कृष्णाजी लक्ष्मण कदम**
(उपाध्यक्ष)

### ✻ विशेष सुचना ✻

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल व अशा सभेला गणसंख्येची आवश्याकता भासणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाल हिशोबाची परिशिष्टे यावर प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दिनांक १८/०८/२०२५ अखेर कार्यालयात आणून द्यावेत. आयत्यावेळी आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत.
३) सभासदांना विनंती आहे की, वार्षिक अहवाल संस्थेच्या मुख्य व शाखा कार्यालयात उपलब्ध आहेत ते घेवुन जाणे.
४) सभेस येताना सभासदाचे पासबुक व अहवालाची प्रत सोबत आणावी.
५) काही अनपेक्षित कारणांमुळे वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास अडचणींचे निवारण करुन सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल.

बीवायपी

## PUBLIC NOTICE

I on behalf of my client is investigating the title of **Mrs. Harsha M. Shah** (owner) in respect of their property being Shop No. **02**, adm. **310 sq. ft.** (Built up area), on the Ground Floor, in the Building known **"Sahakar"** & Society Known as **"Sahakar Apartment Co-operative Housing Society Limited"**, situated at Plot No. 208, TPS III, off Ramnarain Narkar Road Ghatkopar East, Mumbai- 400077, constructed on land bearing CTS No. 5766 of Village Ghatkopar- Kirol, Taluka Kurla, District Mumbai Suburban.

My client have informed me that following title deed has been lost and/or misplace.

**1. Original Agreement for Sale dated 29/06/1982 made between M/s. Dadia Brothers as the Vendor of One Part and Mrs. Bhavana Vasantrai Rupani as the Purchasers of the Other Part.**

Any person having any claims or rights in respect of the said premises by way of inheritance, share, sale, license, gift, mortgage, charge, possession, lease, assignment, lien, ownership, transfer, access, easement, encumbrances howsoever or otherwise and/or having possession of the aforesaid documents and/is hereby requested to make the same known in writing to the undersigned within 14 (fourteen) days from the date of publication of this notice of his/her/their share of claim, if any, with all supporting documents failing which, it will be assumed that there are no claims or issues in respect of the said premises and that the said document shall be treated as irretrievable and/or lost.

**Sd/-**
**Komal N. Jain.**
**Advocate (High Court)**
Office No. 402, 4 th floor, Vaishali Shopping Centre, Beside Natraj Market, S.V. Road, Malad (W) Mumbai- 400064

**Place: Mumbai Date: 05.08.2025**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my Client MRS. MADHUBALA LALIT SETIA has acquired development rights from land Owners (1) DR. (MISS) SUJATA SURANJAN LAHIRI, (2) MR. SURAJIT SURANJAN LAHIRI, (3) MRS. SULEKHA BIMAN CHAUDHURI), (4) MR. RANAJIT SURANJAN LAHIRI, in respect of Property more particularly described in the Schedule hereunder written, free from all encumbrances. Out of the above mentioned Owners, (1) (1a) LATE MR. RANAJIT SURANJAN LAHIRI, (1b) MRS. GITASREE RANAJIT LAHIRI (legal heir of LATE DR. (MISS) SUJATA SURANJAN LAHIRI, (2a) MRS. UMA SURAJIT LAHIRI , (2b) MR. RATHIN SURAJIT LAHIRI, (2c) MR. RANJAN SURAJIT LAHIRI (legal heirs of LATE MR. SURAJIT SURANJAN LAHIRI, (3a) MR. BABHRUBAHAN BIMAN CHAUDHURY, (3b) MRS. JAYA BAISHAMPAYAN CHAUDHURY (legal heirs of LATE MRS. SULEKHA BIMAN CHAUDHURI), (4a) MRS. GITASREE RANAJIT LAHIRI, (4b) MR. SUDIPTA RANAJIT LAHIRI, (4c) MRS. JAYASHRI DELL JONES LAHIRI (legal heirs of LATE MR. RANAJIT SURANJAN LAHIRI are claiming to be the only heirs/ beneficiaries of the said deceased owners and now my client has instructed me to investigate title of the said legal heirs in respect of the said Property. Any person/s or other legal heirs, if any having any right or claim upon the said Property or any part thereof by way of heirship, Sale, Mortgage, Lease, Gift, Interest, Decree, Possession, Inheritance, Court Decree or otherwise are required to intimate the undersigned in writing along with supporting documentary evidence at his office at Akanksha, 2nd Floor, Sane Guruji Nagar, above ICICI Bank, Mulund East, Mumbai 400081, within Fourteen days from the date hereof, failing which it will be presumed that except above mentioned persons, there are no other claimants of the said property and that the said legal heirs are the only heirs of the said deceased Owners, to pass on clear and marketable title to the said property in favour of my client.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

ALL THAT piece and Parcels of land or grounds admeasuring about 425.1 Sq. Mtrs., bearing CTS No.456, 456/1 and 456/2 of Village Bhandup, Taluka Kurla, in the Registration District and Sub-District Mumbai and Mumbai Suburban. PLOT/LAND known as "Bimala Jyoti"

**Dated 6th August, 2025**

**(SAMIR K. VAIDYA)**
**Advocate**

## तरुण उद्योजकांना ३ टक्के व्याजदराने कर्ज



**मुंबई** - महाराष्ट्रात तरुणांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणारे महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर करण्यात आले. या धोरणाअंतर्गत राज्यातील तरुणांना स्वयंरोजगारासाठी ५ ते १० लाख रुपयांचे कर्ज केवळ ३ टक्के व्याजदराने दिले जाणार आहे. हे कर्ज आयटीआय उत्तीर्ण उमेदवार किंवा कोणतेही पदवीधर अर्जदार घेऊ शकतील असा निर्णय सरकारने घेतला आहे. महाराष्ट्र स्टार्टअप उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५ ला आज मान्यता देण्यात आली आहे. सुरुवातीला ५ लाख तरुणांना या योजनेचा लाभ मिळणार असून त्यात मुला-मुलींचा समावेश असेल.

## मराठा आंदोलनात चूक केल्यास मोदींना किंमत मोजावी लागेल! जरांगेंचा इशारा

■ धाराशिव



**मराठा** आरक्षणासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. येत्या २९ ऑगस्टला मुंबईत होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज धाराशिव शहरात पाटील यांनी बैठक घेतली. मुंबईतील आंदोलनात जर काही चूक झाली तर त्याची किंमत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना मोजावी लागेल, असा इशारा जरांगे-पाटील यांनी दिला.

याआधी सगेसोयरे अध्यादेश आणि त्याची अंमलबजावणी या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले होते. ते वाशी येथे महायुती सरकारला थांबवण्यात यशस्वी ठरले होते. मात्र, त्यावेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता झाली नाही, आणि मराठा समाजाला सरसकट ओबीसी आरक्षण मिळालेले नाही. त्यामुळे २९ ऑगस्ट रोजी मुंबईत भव्य आंदोलन होणार असून, त्याच्या तयारीसाठी गावागावांत चावडी बैठका घेतल्या जात आहेत.

मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, एकदा आमचे डोके फुटले, अजूनही आमच्या अंगातल्या गोळ्या निघाल्या नाहीत. अंतरवालीत झालेली चूक पुन्हा करू नका. आंदोलनात जर काही चूक झाली तर त्याची किंमत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांना मोजावी लागेल. मराठ्यांच्या नादी लागायचे नाही.

## शाळकरी मुलीचे लैंगिक शोषण वॉचमनची ९ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता

■ ठाणे

**कोपरी** येथील पालिकेच्या शाळेत शिकत असलेल्या दोन अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या वॉचमनची ९ वर्षांनंतर उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात पोलिसांनी आरोप सिद्ध करण्यास पुरेसे पुरावे सादर न केल्याने न्या. सारंग कोतवाल यांनी या आरोपीच्या सुटकेचा निकाल जाहीर केला.

या प्रकरणात दोन अल्पवयीन मुलींचे शाळेच्या आवारातून अपहरण करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केला तसेच एका मुलाला अश्लील व्हिडिओ दाखविल्याचा आरोप या वॉचमनवर होता. पोलिसांनी आरोपी वॉचमनला २०१८ मध्ये अटक केली होती. त्यानंतर ठाणे न्यायालयाने या आरोपीला दोषी ठरवले होते. या निर्णयाला त्याने उच्च न्यायालयात आव्हान दिले. आपल्याला या प्रकरणात विनाकारण गोवण्यात आल्याचा दावा त्याने केला होता. यावर उच्च न्यायालयात न्या. सारंग कोतवाल यांच्यापुढे सुनावणी झाली.त्यावेळी वॉचमनवरील आरोप सिद्ध करण्यास पोलीस अपयशी ठरले.शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही त्याचे फुटेज त्यांनी सादर केले नव्हते. उलट असे कॅमेरे शाळेत नव्हते असा दावा पोलिसांनी केला होता. पोलिसांच्या तपासात विसंगती दिसत असून ते सबळ पुरावे सादर शकले नसल्याचे नमूद करत वॉचमनची निर्दोष मुक्तता केली.

## परिवहन मंडळाच्या जमिनींचा व्यावसायिक वापराला मंजुरी

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या मालकीच्या अतिरिक्त जमिनींचा व्यावसायिक तत्त्वावर वापर करण्यासाठी सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे महामंडळाचे उत्पन्न वाढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असे सांगितले जात असले तरी खासगीकरणाच्या दिशेने हे पाऊल असल्याचे मानले जाते आहे.

महामंडळाकडे राज्यभरात मोठ्या प्रमाणात मोकळ्या जमिनी आहेत. या जमिनींचा बसस्थानक, वर्कशॉप किंवा डेपोपुरताच मर्यादित उपयोग केला जात होता. महामंडळाच्या जागा मुख्य रस्त्यालगत असून, त्या जागांचा व्यावसायिकदृष्ट्या मोठा उपयोग करता येऊ शकतो. या दृष्टिकोनातून हे सुधारित धोरण आखण्यात आले आहे. महामंडळाच्या माध्यमातून पेट्रोल पंप चालवण्याचा निर्णय मंत्र्यांनी घेतला होता. त्याच सोबत आता या निर्णयामुळे महामंडळ तोट्यातून बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## यापुढे फ्लॅटच्या आकारानुसार मेन्टेनन्स चार्ज भरावा लागणार

■ मुंबई

**यापुढे** निवासी संकूल किंवा गृहनिर्माण सोसायटींमध्ये फ्लॅटच्या आकारमानानुसार म्हणजे क्षेत्रफळानुसार देखभाल शुल्क

**मुंबई हायकोर्टाचा निर्णय**

(मेन्टेनन्स चार्ज) भरावा लागणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अपार्टमेंट मालकी कायदा १९७० नुसार एका प्रकरणात हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

अनेक निवासी संकुलांमध्ये किंवा सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सर्वच फ्लॅटधारकांना समान देखभाल शुल्क आकारले जाते. यासंदर्भात प्रत्येक सोसायटीची वेगवेगळी नियमावली सुध्दा असते. मात्र यापुढे सर्व निवासी संकुले आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये फ्लॅटधारकांना फ्लॅटच्या क्षेत्रफळानुसार देखभाल शुल्क भरावे लागणार आहे. पुण्यातील एका निवासी संकुलातील वादावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या निवासी संकुलामध्ये ११ इमारतींचा समावेश असून, ३५६ फ्लॅट आहेत. व्यवस्थापनाने फ्लॅटचा आकार कितीही असला तरी प्रत्येकाने समान देखभाल शुल्क भरावे असा ठराव मंजूर केला होता. या निर्णयाला छोट्या आकाराच्या फ्लॅटधारकांनी आव्हान दिले होते.



जन्माष्टमी उत्सवासाठी भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरवतानाचे छायाचित्र. (छाया: दीपक साळवी)

## वसई माजी आयुक्तांची ईडीकडून कसून चौकशी

■ मुंबई

**वसई**-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. डम्पिंग ग्राऊंड व मलनिस्सारणासाठी राखीव असलेल्या भूखंडांवर बांधण्यात आलेल्या ४१ अनधिकृत इमारतींच्या भ्रष्टाचार प्रकरणी माजी आयुक्त अनिलकुमार पवार व त्यांची पत्नी यांची ईडीने १० तास चौकशी केली. आजही त्यांची चौकशी करण्यात आली.

गेल्या आठवड्यात ईडीने अनिलकुमार पवार यांना चौकशीसाठी समन्स पाठवले होते. काल सकाळी साडेदहाच्या सुमारास त्यांच्या पत्नीसह ते ईडीच्या वरळी येथील कार्यालयात हजर झाले होते आणि रात्री पावणेदहा वाजता

**४१ अनधिकृत इमारत भ्रष्टाचार प्रकरण!**

बाहेर पडले. ईडीने अनिलकुमार पवार यांच्यावर गंभीर आरोप ठेवले आहेत. अनधिकृत बांधकाम प्रकरणात बिल्डरांना अभय देणे आणि सुमारे अडीच हजार कुटुंबांना बेघर करण्यामध्ये त्यांची मोठी भूमिका असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक जमिनीवरच्या अनधिकृत बांधकामाशी संबंधित मनीलाँड्रीग प्रकरणात ही चौकशी सुरू आहे.

ईडीच्या अधिकाऱ्यांनी २९ जुलै रोजी अनिलकुमार पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी छापे टाकले होते. त्यावेळी नाशिकमध्ये त्यांच्या नातेवाईकांच्या घरी १ कोटी ३३ लाख रुपयांची रोकड सापडली. त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर असलेल्या बेनामी मालमत्तेची कागदपत्रेही जप्त करण्यात आली.

ईडीच्या प्राथमिक तपासानुसार, त्यांनी प्रति चौरस फूट २० ते २५ रुपये दराने लाच स्वीकारल्याचा आरोप आहे.

## एक मंडळ, एक ढोल पथक हवा पुण्यातील गणेश मंडळांची विनंती

■ पुणे

**एक** मंडळ एक ढोल पथक करा, अशी विनंती पुण्यातील गणेश मंडळांनी पोलिसांना केली आहे. त्याचबरोबर मानाच्या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीवेळीच इतर मंडळांना पर्यायी मार्गाने जाण्यास परवानगी द्यावी, अशी मागणीही केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मिरवणुका २९ ते ३० तास लांबत चालल्या आहेत. परंतु हे तास कमी करण्यासाठी काही उपाययोजना राबवण्याच्या उद्देशाने आज पुणे पोलिसांची गणेश मंडळांसोबत बैठक पार पडली. यावेळी गणेश मंडळांनी ही विनंती केली. पुण्यातील मानाच्या पाच गणपतींची मिरवणूक सुरू होण्यापूर्वी मंडळांना इतर रस्त्यांवरून मार्गस्थ होण्यासाठी परवानगी द्यावी, बेलबाग चौक ते नाना पेठ रस्ता गणेशोत्सवादरम्यान सुरू करावा, मानाच्या गणपतींची मिरवणूक दुपारी १२ पर्यंत पूर्ण मार्गस्थ करावी, असे आवाहन मंडळांनी पोलिसांना केले. याशिवाय टिळक रोड वरून मार्गस्थ होणाऱ्या गणेश मंडळांचा निर्णय जवळपास निश्चित असल्याचे मंडळांनी पोलिसांना सांगितले.

## मला खासगी वकील द्या तहाव्वुर राणाची मागणी

■ नवी दिल्ली

२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहाव्वुर राणा याने खासगी वकील नियुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यासाठी त्याने कुटुंबीयांशी संपर्क साधण्याची परवानगी मागितली. या संदर्भातील सुनावणीत पटियाला हाऊस न्यायालयाने एनआयए आणि कारागृह प्रशासनाकडून अहवाल मिळेपर्यंत आदेश राखून ठेवला आहे. याप्रकरणी न्यायालयाकडून ७ ऑगस्ट रोजी निर्णय दिला जाणार आहे. आत्तापर्यंत न्यायालयात तहाव्वुर राणाचे प्रतिनिधित्व सरकारी विधी सहाय्य योजनेअंतर्गत नेमलेला वकील करत आहे.

## आमदार परिणय फुके यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली

■ मुंबई

**शिवसेनेचा** बाप मीच असे आक्षेपार्ह विधान करून वाद ओढवून घेणारे भाजपाचे आमदार परिणय फुके यांनी अखेर आज दिलगिरी व्यक्त करून वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

भंडाऱ्यातील भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्यात शिंदेंच्या शिवसेनेबद्दल बोलताना काही वाईट झाले की, त्याचे खापर बापावर फोडले जाते. त्यामुळे मला हे आता पक्के माहीत झाले आहे की, शिवसेनेचाही बाप मीच आहे. कारण सगळे खापर माझ्यावर फोडत आहेत, अशा आशयाचे विधान केले होते.

फुके यांच्या या वक्तव्यावरून शिंदे गट कमालीचा आक्रमक झाला. फुकेंच्या भाषणानंतर काही वेळातच शिवसेना शिंदे गटाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. फुके यांनी आपल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अन्यथा शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल, असा इशारा पत्रकार परिषदेत स्थानिक नेत्यांनी दिला होता.

## १५ ऑगस्टला रायगडमध्ये झेंडा गोगावले फडकवणार?

■ मुंबई

**१५ ऑगस्ट** रोजी रायगड जिल्ह्यात भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले पाहिजे, अशी इच्छा व्यक्त करून उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रायगडच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार सत्तेवर येऊन आठ महिने उलटून गेले तरी रायगड आणि नाशिक या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. राजगडच्या पालकमंत्रिपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अदिती तटकरे आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे भरत गोगावले यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. तटकरे आणि गोगावले दोघांनीही हा मुद्दा प्रतिष्ठेचा केल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांना अद्याप या मुद्द्यावर तोडगा काढता आलेला नाही.

स्वतः गोगावले यांनीदेखील उदय सामंत यांच्या म्हणण्याचे समर्थन केले. आपल्या नेत्याच्या हातून ध्वजावंदन व्हावे असे प्रत्येक कार्यकर्त्याला वाटते. सामंत यांनी ही भावना व्यक्त केली. त्यात काही गैर नाही, असे गोगावले म्हणाले.

## उत्तरकाशी धारालीत जलप्रलय! ४ मृत्यू तर अनेकजण बेपत्ता

■ उत्तरकाशी



**उत्तरकाशी** जिल्ह्यातील धाराली गावात आज खीरगंगा नदीच्या उगमस्थानी अचानक आलेल्या जलप्रलयामुळे प्रचंड नुकसान झाले. या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला तर अनेकजण बेपत्ता असल्याची प्रशासनाची माहिती आहे.

गंगोत्री धाम मार्गावरील महत्त्वाच्या गावांपैकी एक असलेल्या धारालीमध्ये या नैसर्गिक दुर्घटनेत अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. याठिकाणी २५ पेक्षा जास्त हॉटेल व होमस्टे घरे, बाजारपेठा, दुकाने वाहून गेल्याची माहिती आहे. या दुर्घटनेचे व्हिडिओ व्हायरल झाले. त्यामध्ये पूर व मातीचा ढिगारा गावात घुसताना व नागरिकांची धावपळ दिसते. या पुराचा वेग एवढा होता की, नागरिकांना सुटकेची संधीही मिळाली नाही.

उत्तरकाशीचे जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी माहिती दिली की, अचानक आलेल्या महापुरामुळे संपूर्ण गावाला जोरदार तडाखा बसला आहे. प्रशासनाकडून जीवितहानी व मालमत्ता नुकसानीचा आढावा सुरू आहे. दुर्घटनेच्या माहितीनंतर बचाव व शोधमोहिमेसाठी एनडीआरआफ, एसडीआरएफ पथके घटनास्थळी दाखल झाली. तहसील व सार्वजनिक बांधकाम विभागाचे पथकही घटनास्थळी दाखल झाले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी इंडो-तिबेट सीमा पोलीस दल आणि एनडीआरएफला तत्काळ घटनास्थळी रवाना केले होते.

## उद्धव ठाकरेंचे निवडणूक तयारीचे आदेश! मनसे युती पक्ष ठरवणार

■ मुंबई

**शिवसेना** उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचे आदेश दिले. मुंबई व आसपासच्या भागातील महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. यावेळी मनसे युतीचा निर्णय पक्ष घेणार असल्याचे निर्देशित केले.

उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख आणि महत्त्वाचे पदाधिकारी यांच्यासोबत ठाणे, कल्याण डोंबिवली, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी, वसई-विरार या ७ महापालिका निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी आदेश दिले की, जेथे गटप्रमुखांच्या नेमणुका झालेल्या नाहीत तेथे गटप्रमुखांच्या नेमणुका करा, महापालिकेच्या निवडणुकांच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक तयारी करा.

## बोईंगमध्ये लढाऊ विमान निर्मितीचे कर्मचारी संपावर

■ मुंबई

**बोईंगमधील** सुमारे ३,२०० कर्मचारी कामगार करारावर तोडगा न निघाल्यामुळे संपावर गेले आहेत. या संपामुळे लढाऊ विमानांसह इतर संरक्षण उपकरणांचे उत्पादन आणि देखभाल पूर्णतः ठप्प झाली आहे.

हे कर्मचारी अत्याधुनिक लढाऊ विमाने आणि संरक्षण प्रणाली तयार करत असून, आपल्या कुटुंबियांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि कौशल्याचा योग्य सन्मान करणाऱ्या कराराची त्यांनी मागणी केली आहे. बोईंगकडे सध्या सुमारे ७,००० लढाऊ विमानांच्या ऑर्डर आहेत त्या पुढील दोन वर्षांत पूर्ण करायच्या आहेत. यामुळे उत्पादन ठप्प राहिल्यास कंपनीवर मोठा आर्थिक परिणाम होऊ शकतो.






## विरार डहाणू रेल्वेमार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित

■ मुंबई

**पश्चिम** रेल्वे मार्गावर एमयुटीपीअंतर्गत विरार ते डहाणूदरम्यान चौपदरीकरणाचा मोठा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प मुंबई उपनगरी रेल्वेच्या सुधारित क्षमतेसाठी राबवला जात आहे. परंतु या प्रकल्पासंबंधी २०१८ आणि २०२५ साली मिळालेल्या माहितीच्या अधिकारातील उत्तरांमध्ये विसंगती असल्याचे उघडकीस आले आहे. हा प्रकल्प ६ वर्षांत पूर्ण करायचा होता. मात्र, प्रत्यक्षात तो १० वर्षांतही पूर्ण होणार की नाही याबाबत शंका उपस्थित होत आहे. यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार असल्याने मोठी नाराजी व्यक्त होत आहे.

२०१८ साली या प्रकल्पाचा कालबद्ध आराखडा जाहीर करण्यात आला होता. यामध्ये ५ मार्च २०१८ रोजी एमआरव्हीसीने डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेचे जनसंपर्क अधिकारी हितेश सावे यांच्या माहिती अधिकारातील अर्जाला उत्तर देताना प्रकल्पाच्या कार्यपद्धतीचा तपशीलवार आराखडा दिला होता. त्यानुसार जमीन संपादन डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तर डिसेंबर २०२१ पर्यंत मातीचे काम व पूल बांधकाम पूर्ण होणार होते.

## लाल किल्ल्यात डमी बॉम्ब कुणालाच सापडला नाही

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या सुरक्षा व्यवस्थेतील मोठी आणि गंभीर चूक उघडकीस आली आहे. सुरक्षा सरावादरम्यान (मॉक ड्रिल) तपासणीसाठी आणलेला एक बनावट बॉम्ब

**७ पोलीस निलंबित**

(डमी बॉम्ब) सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या नजरेत आला नाही आणि बॉम्ब घेऊन माणूस किल्ल्यात शिरला . या प्रकरणी तेथे कार्यरत असलेल्या ७ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

मागील आठवड्यात लाल किल्ल्यावर तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांची सतर्कता आणि सज्जता तपासण्यासाठी एक नियमित सुरक्षा सराव आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत, पोलिसांच्याच एका विशेष पथकाला एक बनावट बॉम्ब घेऊन किल्ल्याच्या परिसरात प्रवेश करण्यास सांगितले होते. सुरक्षा यंत्रणा हा बनावट बॉम्ब ओळखू शकते की नाही हे तपासणे हा यामागील मुख्य उद्देश होता. मात्र, विशेष पथक किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारावरील सुरक्षा तपासणी सहज पार करून बनावट बॉम्ब घेऊन आत आले. तैनात असलेल्या कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला हा बनावट बॉम्ब ओळखता आला नाही. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, डमी बॉम्ब घेऊन पथकाने सुरक्षा तपासणी यशस्वीपणे पार केली. कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेवर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याला अत्यंत गांभीर्याने घेत दिल्ली पोलिसांनी तातडीने ७ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.